बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के


दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | बुधवार,दि.२१ मे २०२५ | वर्ष४थे | अंक२७६वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३



# छगन भुजबळ पुन्हा मंत्रिमंडळात

आशा लावून बसलेले राहिले आशेवर | तिसऱ्यांदा भुजबळ यांच्याकडे या खात्याची सूत्र | धनंजय मुंडेंच्या बळच राजीनाम्यानंतर पद होते रिक्त

## अन्न व नागरी पुरवठा खाते मिळणार?

**धनंजय मुंडे नाराज?**

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या मंत्रिपदावर छगन भुजबळांची वर्णी लागली. त्यानंतर धनंजय मुंडे नाराज असल्याची चर्चा सुरू झाली. मुंडे यांनी मंगळवारी रात्री उपमुख्यमंत्री अजित पवारांची भेट घेतली. त्यानंतर हे दोन्ही नेते देवेंद्र फडणवीसांच्या भेटीला गेले. मुंडे यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला जात असल्याची माहिती आहे.

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार यांच्या पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनी आज राजभवनमध्ये मंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांना शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त जागेवर भुजबळ यांना स्थान देण्यात आले. छगन भुजबळ यांना पुन्हा अन्न व नागरी पुरवठा खाते देण्यात येण्याची शक्यता आहे. तिस-यांदा भुजबळ यांच्याकडे या खात्याची सूत्र जाणार आहेत.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड यश मिळाले होते. त्यानंतर देवेंद्र फडणवीस सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळ विस्तारात छगन भुजबळ यांचा समावेश झाला नव्हता. त्यामुळे छगन भुजबळ प्रचंड नाराज झाले होते. त्यांनी उघडपणे आपली नाराजी व्यक्त केली होती. मंत्रिपद न मिळाल्याने भुजबळ राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्त्वापासून आणि पक्षीय घडामोडींपासून लांब राहिले होते. आता त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे आणि खासदार प्रफुल्ल पटेल यांनी ७ दिवसांपूर्वीच छगन भुजबळ यांना पुन्हा मंत्री करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. त्यासंदर्भातील निर्णय भुजबळ यांना कळवला होता. भुजबळ यांनी त्याला दुजोरा दिल्याने मंत्रिपदावर वर्णी लागली.

# सरन्यायाधीशांची नाराजी, सरकारला जाग

खंत:स्वागताला कोणताही वरिष्ठ अधिकारी हजर नाही

पुण्यभूमी प्रतिनिधी



मुंबई:देशाचे ५२ वे सरन्यायाधीश भूषण गवई महाराष्ट्राचे सुपूत्र आहेत. मात्र सरन्यायाधीश म्हणून महाराष्ट्रात आल्यानंतर प्रोटोकॉलनुसार वरिष्ठ अधिका-यांनी त्यांचे स्वागत करणे आवश्यक असते. परंतु त्यांच्या स्वागताला कोणताही वरिष्ठ अधिकारी हजर झाला नाही. त्यामुळे सरन्यायाधीशांनी जाहीर नाराजी बोलून दाखविली. त्यानंतर राज्याच्या मुख्य सचिवांसह वरिष्ठ अधिका-यांची तारांबळ उडाली. यावरून सरकारच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. या घटनेनंतर आता सरकार खडबडून जागे झाले असून, पुन्हा अशी चूक होऊ नये, म्हणून थेट दिशानिर्देश जारी केले.

यापुढे सरन्यायाधीश महाराष्ट्राच्या दौ-यावर आले तर पुन्हा कोणतीही चूक होऊ नये, यासाठी सरन्यायाधीशांच्या महाराष्ट्र प्रवासात कोणते राजशिष्टाचार पाळावेत, यासाठी राज्य सरकारने दिशानिर्देश जारी करताना थेट परित्रकच काढले. या माध्यमातून सरकारने अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. त्यानुसार भारताचे सरन्यायाधीश आता कायमस्वरुपी राज्य अतिथी असतील. तशी घोषणा पान २ वर

### सरन्यायाधीशांची उघडपणे नाराजी

सरन्यायाधीश भूषण गवई यांचा १८ मे रोजी महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलतर्फे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. पण त्यांच्या महाराष्ट्र दौ-यादरम्यान समन्वयासाठी वरिष्ठ अधिकारी अनुपस्थित होते. याबाबत त्यांनी भाषणात जाहीर नाराजी व्यक्त केली होती. सरन्यायाधीश महाराष्ट्राचे असून राज्याचे पोलिस महासंचालक, मुख्य सचिव, पोलिस आयुक्त यांना इथे यावे वाटले नाही. त्याचा विचार त्यांनीच करावा, असे सुनावले होते.

# परळी तालुक्यात बौद्धांवर अन्याय!

मंत्री पंकजा मुंडे,आ. धनंजय मुंडे मात्र अनभिज्ञ | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कमानीसाठी उपोषण




पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री नामदार पंकजाताई मुंडे तसेच माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या परळी तालुक्यात बौद्ध समाजावर अन्याय होताना दिसून येत आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार व बहुजन समाजाचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने कमान उभारण्यासाठी परवानगी द्यावी या मागणीसाठी आज दिनांक २० मे पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बौद्ध समाजाच्या वतीने महिला,लेकरा बाळासह उपोषण सुरू करण्यात आले आहे. दरम्यान बीड शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या वतीने पाच उपोषणकर्त्यांना परवानगी दिली असून भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १६८ नुसार नोटीसही दिली आहे.

याबाबत परळी तालुक्यातील दौनापूर येथील बौद्ध समाजाने बीड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते .या निवेदनात म्हंटले होते की,दिनांक ५ एप्रिल २०२५ रोजी दौनापूर येथील बौद्ध समाजाच्या वतीने ग्रामपंचायतीला बौद्ध वस्ती समोरील रस्त्यावर प्रवेशद्वार अर्थातच कमान उभारण्याची परवानगी मागण्यासाठी अर्ज केला. त्यावर ग्रामपंचायतीने परवानगी तर दिलीच नाही उलट सरपंच राजेभाऊ प्रभाकर आघाव यांनी ग्रामपंचायतीचा ठराव घेतला.व ठरावा द्वारे कमानीला परवानगी देण्यात येणार नाही असे सांगितले होते.त्यानंतर दौनापूर येथील बौद्ध समाजाने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रवेशद्वार,( कमान) करण्याची परवानगी द्यावी अन्यथा २० मे २०२५ पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पान २ वर

# ३२५ उद्योगांना मंजुरी; राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झाला निर्णय

पुण्यभूमी प्रतिनिधी



मुंबई:उद्योग विभागातील धोरण कालावधी संपुष्टात आल्यामुळे प्रलंबित असलेल्या ३२५ प्रस्तावांना मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या प्रस्तावांना मंजुरी दिल्यामुळे १ लाख ६५५ कोटी ९६ लाख रूपयांची गुंतवणूक आणि ९३ हजार ३१७ रोजगारनिर्मिती होणे अपेक्षित आहे.उद्योग विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण २०१६ आणि त्या अंतर्गत फॅब प्रकल्पाकरिता प्रोत्साहने, महाराष्ट्राचे अवकाश आणि संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण २०१८, रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स ॲण्ड ज्वेलरी, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स आणि अभियांत्रिकी घटक यासाठी फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले धोरण २०१८, महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण २०१९ या धोरणांचा कालावधी संपुष्टात आला आहे.सदर विषयांचे नवीन धोरण ठरविण्याची पान २ वर

### मुंबईसाठी आणखी धरण पोशीर प्रकल्पाला मान्यता

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील पोशीर प्रकल्पास ६ हजार ३९४ कोटी १३ लाख रुपये अंदाजपत्रकाच्या प्रशासकीय मान्यतेस मंजुरी देण्यात आली. पोशीर नदीवर १२.३४४ टीएमसीचे धरण बांधणे प्रस्तावित आहे. या प्रकल्पाचे पाणी मुंबई महानगर, नवी मुंबई, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर आदी शहरांना पुरविले जाणार आहे.



# माहिती अधिकारात दिरंगाई महागात

अशोक कातखडेंच्या तक्रारीची घेतली गंभीर दखल | उपजिल्हाधिकारी संतोष राऊत विरोधात शिस्तभंगाची कारवाई

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:भ्रष्टाचार निर्मूलन समिती मराठवाडा अध्यक्ष श्री. अशोक कातखडे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेल्या तक्रारीची राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने गंभीर दखल घेतली असून, संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.श्री. कातखडे यांनी १८ नोव्हेंबर २०२२ रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक विभागाकडे सन २०१८-१९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांतील खर्चाचा तपशील मागवला होता. मात्र, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कायद्यात नमूद असलेली ३० दिवसांची मुदत उलटून गेल्यानंतरही माहिती न दिल्याने त्यांनी प्रथम अपील आणि नंतर द्वितीय अपील दाखल केले.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनीही विहीत ४५ दिवसांच्या मुदतीत आदेश न देता सुनावणीला टाळाटाळ केली. यानंतर श्री. कातखडे यांनी २१ मार्च २०२३ रोजी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात दाखल केला.राज्य माहिती आयोगाने २१ नोव्हेंबर २०२३ रोजी या प्रकरणात पान २ वर

डॉ. ज्योती मेटे | मुलींच्या नावे करणार ५ हजारांचे डिपॉझिट

# राजेगाव राबवणार लेक लाडकी योजना

पुण्यभूमी प्रतिनिधी




बीड:जिल्ह्यातील केज तालुक्यातील राजेगाव या ठिकाणी औद्योगिक, व्यापारी, नौकरी, शासकीय, निमशासकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा नागरी सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी मंचावर उपस्थित असलेल्या शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी लोकनेते विनायकराव मेटे साहेबांनी सुरू केलेली चळवळ पुढे घेऊन जाण्याकरिता राजेगावात जन्मलेल्या मुलीच्या नावे ५ हजार रुपये फिक्स डिपॉझिट करण्याची घोषणा केली याला राजेगाव ग्रामपंचायतिने सहमती दर्शवली असून आता राजेगावात जन्माला येणाऱ्या मुलींच्या नावे ग्रामपंचायतच्या वतीने पाच हजार रुपये फिक्स डिपॉझिट करण्यात येणार आहे. याकरिता लागणाऱ्या निधी करिता डॉ. ज्योती मेटे यांनी ग्रामपंचायतीकडे धनादेश सुपूर्त केला आहे.

राजेगाव ता.केज जि. बीड या ठिकाणी औद्योगिक, व्यापारी, नौकरी, शासकीय, निमशासकीय क्षेत्रातीलविध क्षेत्रात आणि दहावी, बारावी परीक्षेत गावाचे नाव उंच शिखरावर पोहोचविणाऱ्या मान्यवरांचा आणि विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ पार पडला यावेळी महामानव आणि लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबर सध्या कमी होत असलेल्या मुलींचा जन्मदर लक्षात घेता लोकनेते पान २ वर

# अतिक्रमण हटविण्यास विलंब?

सवाल: ग्रामस्थ करताहेत उलटसुलट चर्चा

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज:केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील अतिक्रमण हटविण्यासाठी अनेक दिवसांपासून पाठपुरावा सुरू आहे परंतु केज पंचायत समितीचे सार्वजनिक बांधकाम विभाग विलंब करत आहे यांचे कारण असे केज पंचायत समितीच्या जिल्हा परिषद बांधकाम विभागाने चिंचोली माळी येथील अतिक्रमण धारकाकडुन हप्ता घेतला आहे की काय असा प्रश्न उपस्थित होतो आहे कारण अनेक दिवस झाले निवेदनाद्वारे कळविण्यात आले परंतु अतिक्रमण हटविण्यात आले नाही त्यामुळे अतिक्रमण धारकाकडुन हप्ता घेतला आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे कारण मग काय पंचायत बांधकाम विभाग केज यांना काय शासन पगार देत नाही का असे समजले जाते आहे एवढ्या मोठ्या प्रमाणात अतिक्रमण असुन सुद्धा सार्वजनिक बांधकाम विभाग वारंवार पाठपुरावा करूनही अतिक्रमण काढत नाही म्हणजे नक्कीच अतिक्रमण धारकाकडुन हप्ता घेतला आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

## वामन परतोनि गेला

मराठी सारस्वताच्या अंगणात जयंत नारळीकर यांचे आगमन झाले तेव्हा आपले साहित्य विश्व हे गद्या-पद्या, कथा-लघुकथा, समीक्षा- रूपवादी समीक्षा इत्यादींत रममाण होते. आपल्या साहित्यविश्वापासून विज्ञान तसे दूर. विज्ञान, अर्थादी विषयांस ललित क्षेत्राने गावकुसाबाहेर रोखलेले. वास्तविक केरूनाना छत्रे यांच्यापासून 'इंडियाज एडिसन' असे गौरवले गेलेले शंकर आबाजी थत्ते ते विमानउड्डाणाचे स्वप्न पाहणारे तळपदे इत्यादी अनेक मराठीच. परंतु मराठी जनांच्या रक्तात विज्ञानवृत्तीचा अभाव असावा. अन्यथा 'वैदिक गणित' या संकल्पनेस हात घालणारे, रामायण-महाभारताचा काळ शोधू पाहणारे बळवंतराव 'गीतारहस्या'साठीच अधिक ओळखले जाते ना. या अशा विज्ञानांधारी वातावरणात जयंत नारळीकर यांचे येणे हा प्रकाशमान सूर्योदय होता. घरातून मिळालेल्या विज्ञान वारशाचा ध्वज जयंतरावांनी केवळ फडकतच ठेवला असे नाही; तर स्वकष्टाने अधिक उंचीवर नेला. पाश्चात्त्य विद्यापीठांत उच्च शिक्षणासाठी विष्णु नारळीकर आणि त्याचे सुपुत्र जयंत अशा दोघांस टाटा समूहाची शिष्यवृत्ती आपापल्या पिढीत मिळाली. या अशा परंपरेचे हे आगळे उदाहरण. विष्णु नारळीकरांपेक्षा जयंतराव एक पाऊल पुढे गेले आणि साहित्यकृतीतून जनसामान्यांस अधिक जवळचे झाले. ते लिहिते झाले तेव्हा मराठीत विज्ञानकथा हा प्रकार नवीन होता. त्यात जयंतराव सच्चे वैज्ञानिक. आपल्याकडे भाभा अणुकेंद्रांतील कारकुनाचा परिचयही वैज्ञानिक असा करून दिला जात असताना खराखुऱ्या वैज्ञानिक जयंतरावांचे असणे तसे अप्रूपच. ते आता संपले.

'कृष्णविवर' ही पहिली कथा जयंतरावांनी १९७४ मध्ये मराठी विज्ञान परिषदेच्या 'विज्ञान कथा स्पर्धे'साठी पाठवली, त्याअर्थी तोवर मराठीत विज्ञानकथा लिहू पाहणारे अनेक जण होते. पण या विज्ञानकथांचा बाज परग्रहावरून पृथ्वीवर आक्रमण किंवा तत्सम प्रकारचा असे. 'कृष्णविवर' ही कथा जयंतरावांनी आपल्या नावाचा दबाव कुणावर येऊ नये म्हणून टोपण नावाने- आणि आपले अक्षरही कळू नये म्हणून सहचरी मंगला नारळीकर यांच्या हस्ताक्षरात- पाठवली, तरीही तीच अव्वल ठरणे साहजिक होते. पण एखाद्या बक्षिसापेक्षा अव्वल काम त्या कथेने केले. वैज्ञानिक सिद्धान्तांशी निष्ठा राखणाऱ्या आणि अशा सिद्धान्तांचा प्रचार करण्यासाठी कल्पनेचा आधार घेणाऱ्या नव्या मराठी विज्ञानकथेची सुरुवात 'कृष्णविवर'मुळे झाली. वास्तविक कृष्णविवरांचा बोलबाला विज्ञानातही नव्हता तेव्हा १९६४ साली मांडला गेलेल्या 'हॉएल- नारळीकर सिद्धान्ता'ने 'आकुंचन पावलेल्या ताऱ्यात वा तारकापुंजात दीर्घकाळात गुरुत्वीय बल कमीजास्त होऊ शकते' असेही निरीक्षण नोंदवले होते. पण गुरुत्वाकर्षण अत्यधिक असलेल्या कृष्णविवरातला 'काळ' कसा असेल, त्याच्याशी पृथ्वीवरचा काळ आणि कालगणना यांचे प्रमाण कसे असेल, याचे संशोधन डॉ. नारळीकर आणि त्यांचे मार्गदर्शक फ्रेड हॉएल यांच्या त्या वेळच्या विषयाबाहेरचे होते. कृष्णविवरात काळ गोठतो- म्हणजे त्याची गती कमी होते- म्हणजेच त्यात माणूस शिरल्यास त्याचे वयही गोठते- ही कल्पना जयंतरावांची, त्यातून 'कृष्णविवर' लिहिली गेली. पण जयंतरावांच्या एकंदर विज्ञानकथा लेखनातली 'कल्पना' म्हणजे काय?

मराठीतल्या भावगीतांनी रुळवलेल्या कल्पनांसारखी ही विज्ञानकथांतली कल्पना स्वैर नव्हती. सोप्या मराठीत विज्ञानाबद्दल काही सांगण्याचा प्रयत्न जयंतराव एरवीही करतच असत, मग 'कल्पना' आणि कथा कशासाठी? याचे उत्तर जयंतरावांच्या सोप्या मराठीतूनच मिळते. 'अभ्युपगम' अर्थात इंग्रजीतल्या 'हायपोथिसिस' या शब्दाऐवजी 'विज्ञानात अशी एक कल्पना आहे' असे ते म्हणत. इथे कल्पना म्हणजे, प्रयोग आणि निरीक्षणांतून सिद्ध न झालेला वैज्ञानिक विचार. उपलब्ध आणि प्रयोगसिद्ध वैज्ञानिक सिद्धान्तांच्याही पुढे जाऊ पाहणारे कुतूहल. उदाहरणार्थ 'मोबियस स्ट्रिप' ही उलट्याचे सुलटे किंवा सुलट्याचे उलटे करणारी पट्टी निश्चितपणे एक गणिती सिद्धान्त मांडते. पण ही पट्टी किंवा तिच्यामागचा सिद्धान्त जर गणितातून प्रत्यक्षात आला आणि माणसे किंवा वस्तू त्यात जाऊन उलट/सुलट होऊ लागल्या तर उजव्या हाताने लिहिणारा माणूस डावखुरा होईल का? डाव्या सोंडेचा गणपती उजव्या सोंडेचा होईल का? या प्रश्नांमागे जो 'तर काय होईल' हा विचार आहे, ती कल्पना. या कल्पनेतून 'उजव्या सोंडेचा गणपती'सारखी कथा लिहिली गेली. त्यानिमित्ताने मराठीत मोबियस पट्टीची चर्चा झाली. अशा कैक वैज्ञानिक सिद्धान्तांना कल्पनेची जोड देऊन नारळीकरांच्या विज्ञानकथांनी मराठीच नव्हे तर हिंदी, इंग्रजी वाचकांचेही कुतूहल शमवले आणि जागवले.


आपल्याकडे ललित साहित्य हे निर्हेतुक असावे, अशा आग्रहाचा सुकाळ. त्यामुळे विज्ञानप्रसाराच्या हेतूसाठी कथा, कादंबरिका लिहिणाऱ्या जयंतरावांना अनेकांनी अव्वल मानले नाही. वास्तविक सहेतुक साहित्य ही प्रत्येक समाजाची गरज असतेच आणि त्यासाठी हेतू उदात्त असावा लागतो. प्रचार हाच हेतू असून चालत नाही. हे तारतम्य सुटण्याइतपत कलावादाचा पगडा आपल्याकडे होता त्यामुळे सुरुवातीला जयंतरावांच्या प्रयत्नांतली उदात्तता कुणाला उमजलीच नाही. तशी उमज वाढण्यासाठी दुर्गाबाई भागवतांनी कराड साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून नारळीकरांच्या कथांचे केलेले कौतुकही फारसे कामी आल्याचे दिसले नाही. पुन्हा मराठीत काही चांगले लिहिले जाते आहे त्याअर्थी ते परभृतच- पक्षी इंग्रजीतून चोरलेलेच- असणार, असा आपल्याकडच्या समीक्षकांचा खाक्या. त्या खाक्यातले दंडुके नारळीकरांवरही फिरले. केवळ 'एक ऑक्टोबर' ही तारीख इंग्रजी कथेतली, म्हणून अख्खी कथाच 'बेतलेली' आहे असा शेरा एका समीक्षकाने ठोकून दिला. सर आर्थर कॉनन डॉयल यांची गाजलेली पात्रे- शेरलॉक होम्स आणि वॉटसन- स्वत:च्या कथेत आणताना नारळीकरांनी विनयशीलपणे म्हणा किंवा गंमत म्हणून, अख्ख्या कथेत मराठीचा बाज भाषांतरासारखा ठेवला- तोही, त्या काळात भा. रा. भागवत यांनी केलेली शेरलॉक होम्स-मालेची भाषांतरे आठवतील, असा! या लेखकीय क्लृप्तीला दाद देण्याऐवजी 'ही कथा मूळच्या इंग्रजी अमुकतमुक कथेचे भाषांतर आहे' असे विधान करून कुणा समीक्षकाने स्वत:च्याच अकलेचे दिवाळे दाखवले.

# खगोल शास्त्रज्ञ नारळीकर यांचं निधन

## दु:खद: ८६ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:विज्ञान आणि साहित्य अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये उत्तुंग कामगिरी करणाऱ्या डॉ. जयंत ~~नारळीकर यांचं वृद्धापकाळाने निधन झालं.~~ ते ८६ वर्षांचे होते. नारळीकर हे जागतिक ख्यातीचे शास्त्रज्ञ होते. वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी त्यांना पद्मभूषण पुरस्कार मिळाला होता.ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचं निधन झालं. वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. वृद्धापकाळाने त्यांची प्राणज्योत मालवली. विज्ञान आणि साहित्य अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये नारळीकरांनी उत्तुंग कामगिरी केली. नारळीकरांनी ११ जून १९६४ रोजी गुरुत्वाकर्षणासंबंधीचा सिद्धान्त मांडला होता. अवघ्या २६ व्या वर्षी त्यांनी हा सिद्धान्त मांडला होता. त्यातूनच पुढे विश्वनिर्मितीच्या रहस्यावरील संशोधनाला चालना मिळाली. नारळीकर हे जागतिक ख्यातीचे शास्त्रज्ञ आणि मराठी विज्ञानकथेला आधुनिक चेहरा देणारे लेखक होते. ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली होती.गुरुत्वाकर्षणासंबंधीचा सिद्धान्त मांडल्यानंतर एका रात्रीत नारळीकरांचं नाव घरोघरी पोहोचलं होतं. त्यावेळी ते स्वतंत्र भारतातील विज्ञानजगताचा चेहरा ठरले होते. त्यानंतर १९६५ मध्ये भारतदर्शन मोहीम काढत नारळीकरांनी ठिकठिकाणी व्याख्यानं दिली होती. सरकारकडूनही नारळीकरांची दखल घेण्यात आली होती. १९६५ मध्ये त्यांना 'पद्मभूषण' या पुरस्काराने गौरविण्यात आलं होतं. त्यावेळी ते सत्तावीस वर्षांचे होते. पुढे २००४ मध्ये त्यांना 'पद्मविभूषण' सन्मानही मिळाला. २०१० मध्ये त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आलं होतं.नारळीकरांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापुरात झाला होता. त्यांचे वडील विष्णू नारळीकर हे प्रसिद्ध गणितज्ञ आणि वाराणसी इथल्या हिंदू विद्यापिठाच्या गणित शाखेचे प्रमुख होते. नारळीकरांचं शालेय शिक्षण वाराणसीमध्येच झालं. १९५७ मध्ये त्यांनी विज्ञानात पदवी प्राप्त केली होती. या परीक्षेत त्यांनी पहिला क्रमांक पटकावला होता. त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी केंब्रिजला गेले.नारळीकर यांचं चार दशकांहून अधिक काळापासून खगोलभौतिकी क्षेत्रात संशोधन सुरू होतं. त्याचसोबत ते पुस्तकंही लिहित होते. सर्वसामान्य माणसाला खगोलशास्त्रज्ञ समजवण्यासाठी त्यांनी गेली अनेक वर्षे प्रयत्न केले आहेत. त्यांच्या 'यक्षांची देणगी' या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. 'अंतराळातील भस्मासूर', 'अभयारण्य', 'अंतराळातील स्फोट', 'टाइम मशीनची किमया', 'प्रेषित' अशी अनेक विज्ञानकथांची पुस्तकं त्यांनी लिहिली आहेत. दररोजच्या संशोधनाच्या कामातून विरंगुळा मिळावा, सामान्य वाचकाला वैज्ञानिक विश्वातील एखादा थरारक अनुभव द्यावा, विज्ञानाचं महत्व आणि वैज्ञानिक दृष्टीकोन समाजाला मिळावा म्हणून ते विज्ञानकथा लिहित असत. त्यांच्या पुस्तकांची विविध भाषांमध्ये भाषांतरे झाली आहेत. त्याचप्रमाणे विविध मराठी नियतकालिकांमधून नारळीकर यांचे विज्ञानविषयक ललित लेखन सातत्याने प्रसिद्ध होत असत.



# गडचिरोलीत पाच नक्षली अटकेत

## कारवाई:३६ लाख रुपयांचे बक्षीस केले होते जाहीर

पुण्यभूमी प्रतिनिधी

गडचिरोली:अनेक हिंसक कारवायांमध्ये सक्रिय असलेल्या पाच नक्षलवाद्यांपैकी तिघांना अटक तर दोघांना गडचिरोली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. भामरागड तालुक्यातील अबूझमाडच्या बिनागुंडा परिसरात ही कारवाई करण्यात आली. त्यांच्यावर तब्बल ३६ लाख रुपयाचे बक्षीस होते. त्यांच्याकडून एक स्वयंचलित एसएलआर रायफल, दोन भरमार बंदूक आणि ४ रायफल असे ७ हत्यार जप्त केले.

उंगी होयाम ऊर्फ सुमली, पल्लवी केसा मिडीयम ऊर्फ बंडी, देवे कोसा पोडीयाम ऊर्फ सबिता असे अटक केलेल्या नक्षलवाद्यांची नावे असून इतर दोघे वयाचा ठोस पुरावा नसल्याने त्यांना ताब्यात घेतले आहे. भामरागड तालुक्यातील बिनागुंडा परिसरात गडचिरोली पोलिसांचे सी-६० कमांडो आणि सीआरपीएफ बटालियन ३७ चे जवान अभियानावर असताना गोपनीय माहितीच्या आधारे गावाला घेराबंदी करण्यात आली. तेव्हा काही नक्षल गणवेशात आणि काही साध्या वेशातील संशयित पोलिस पथकावर घातपात घडवण्याची योजना आखत असल्याचे समोर आले. यातील काही जण पळून जाण्यात यशस्वी झाले तर पाच जणांना ताब्यात घेतले.विविध माओवादी चकमकीत सहभागी असलेल्या जहाल माओवादी 'देवसू'सह अन्य तीन माओवाद्यांनी गोंदिया पोलिसांसमोर आत्मसर्पण केले. २०१७ पासून विविध माओवादी चकमकीत सहभागी असलेल्या जहाल माओवादी देवसूवर ३.५० लाख रुपयांचे बक्षीस होते तर गोंदिया जिल्ह्यात २०२४ पासून सक्रिय असलेल्या अन्य ३ माओवाद्यांनीही आत्मसमर्पण करून समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.



### असे बक्षीस केले होते जाहीर

उंगी होयामवर १६ लाख, पल्लवी मिडीयमवर ०८ लाख रूपयांचे तर देवे पोडीयाम ०४ लाख रूपयांचे बक्षीस होते. इतर दोघांवर ८ लाख रुपयांचे बक्षीस असल्याची माहिती समोर आली आहे.

# ४० लाख ३१ हजार रुपयांचा गुटखा जप्त; एका इसमाविरुद्ध गुन्हा दाखल

गेवराई/प्रतिनिधी

मौजे पांढरवाडी, ता. गेवराई येथे स्थायी गुन्हे शाखा, बीड यांनी छापा टाकून तब्बल ४० लाख ३१ हजार ६०० रुपये किंमतीचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थ जप्त केला. याप्रकरणी दादासाहेब अंकुश जाधव या इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनित कॉवत यांनी अवैध धंद्यांविरुद्ध कठोर कारवाईचे आदेश दिल्यानंतर पोनि उस्मान शेख (स्थागुशा, बीड) यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाला गोपनीय माहिती काढण्यास सांगण्यात आले होते. त्यानुसार दिनांक २० मे २०२५ रोजी पोउपनि सुशांत सुतळे व पोउपनि सिद्धेश्वर मुरकुटे हे पोलीस ठाणे गेवराई हद्दीत गस्त घालत असताना त्यांना माहिती मिळाली की दादासाहेब जाधव हा आपल्या राहत्या घरी व वाहनांमध्ये मोठ्या प्रमाणात गुटखा साठवून ठेवत आहे. सदर माहितीच्या आधारे पथकाने तातडीने पांढरवाडी येथे छापा टाकला असता, दादासाहेब जाधव याच्या घरात व बोलेरो पिकअप व स्विफ्ट डिझायर या वाहनांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटखा, सुगंधीत पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले. एकूण ४०,३१,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीने काही गुटख्याचे साठा कर्नाटक व मध्यप्रदेशातील इंदूर येथून आणल्याचे तपासात निष्पन्न झाले असून आणखी दोन आरोपींची नावे समोर आली आहेत. आरोपीस अटक करून त्याच्याविरुद्ध भारतीय दंड विधान कलम १२३, २२३, २७४, २७५ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही यशस्वी कारवाई मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, पोनि उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे, पोउपनि सिद्धेश्वर मुरकुटे, पोह. विष्णू सानप, राजू पठाण, राहुल शिंदे, विकास राठोड, मनोज वाघ, कैलास ठोंबरे, विकास वाघमारे, चालक नितीन वडमारे व चालक सुनील राठोड यांच्या पथकाने केली.



# धोकादायक आरोपी गणेश गिरी याच्यावर कारवाई

बीड/प्रतिनिधी

शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील अत्यंत धोकादायक व गुन्हेगारी प्रवृत्तीचा आरोपी गणेश भारत गिरी (वय २३ वर्षे, रा. इंद्रप्रस्थ कॉलनी, नगर रोड, बीड) याच्यावर महाराष्ट्र प्रतिबंधक अधिनियम (MPDA) अंतर्गत कठोर कारवाई करत एक वर्षासाठी मध्यवर्ती कारागृह हर्सूल, छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबद्ध करण्यात आले आहे.

सदर आरोपीविरुद्ध खंडणी मागणे, वाहने फोडणे, जाळपोळ करणे, मारहाण, धमकी देणे, दंगा व गैरकायद्याची मंडळी जमवणे अशा गंभीर स्वरुपाचे एकूण चार गुन्हे शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल आहेत. गणेश गिरी याने बीड शहर व परिसरात गुन्हेगारीचे वातावरण निर्माण करत सर्वसामान्य नागरिकांचे जनजीवन त्रस्त केले होते.त्यामुळे त्याच्यावर एम.पी.डी.ए. कायद्यांतर्गत कारवाईचा प्रस्ताव तयार करून मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनित कॉवत यांच्यामार्फत मा. जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास मान्यता देत मा. जिल्हाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी दादा व इतर समाजविघातक घटकांविरुद्ध लागू असलेल्या अधिनियम १९८१ (सुधारणा २००९ व २०१५) च्या कलम ३(१) नुसार गणेश गिरी यास एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचा आदेश दिला. या आदेशानुसार गणेश गिरी यास अटक करून आज हर्सूल, छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यात आले आहे. ही महत्त्वपूर्ण कारवाई मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विश्वंभर गोल्डे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. मारोती खेडकर, सपोनि जी.जे. क्षिरसागर, पोउपनि माधव काटकर, तसेच पोलीस कर्मचारी पोह. परजने, पोह. गायकवाड, पोशि. कांदे व पोशि. बहिरवाळ यांच्या पथकाने संयुक्तरीत्या केली.



## पान एक वरून

**सरन्यायाधीशांची नाराजी**

करण्यात आली होती. तसेच सरन्यायाधीश जेव्हा मुंबईत असतील तेव्हा मुख्य सचिव अथवा त्यांचे प्रतिनिधी, पोलिस महासंचालक अथवा त्यांचे प्रतिनिधी मुंबईत सरन्यायाधीशांच्या स्वागतासाठी उपलब्ध असतील.राज्यातील अन्य जिल्ह्यांत जिल्हाधिकारी किंवा त्यांचे वरिष्ठ प्रतिनिधी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक अथवा त्यांचे प्रतिनिधी सरन्यायाधीशांच्या दौ-यादरम्यान समन्वयासाठी उपस्थित असतील, असाही आदेश राज्य सरकारने जारी केला. यासोबतच कोणी व्हीव्हीआरपी येत असतील तर त्यांच्या विभागाशी संबंधित संपर्कासाठी समन्वय अधिकारी नेमणे आधीच्या आदेशानुसार बंधनकारक आहे. त्यामुळे सरन्यायाधीशांच्या भेटीवेळी विधी व न्याय विभागाने मुंबईसाठी तर जिल्ह्यात असेल जिल्हाधिका-यांनी समन्वयासाठी प्रथम श्रेणीचा अधिकारी नेमणे बंधनकारक असेल, असेही या आदेशात नमूद केले आहे.

**३२५ उद्योगांना मंजुरी; राज्य मंत्रिमंडळ**

सुनावणी घेतली. सुनावणीला कातखडे स्वतः हजर होते, परंतु संबंधित जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी गैरहजर होते. आयोगाने त्यांच्या अनुपस्थितीची गंभीर दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांनी कायद्याचे उल्लंघन केल्याचे नमूद करत त्यांच्यावर कारवाईचे निर्देश दिले.या निर्णयाच्या अनुषंगाने मा. दिलीप गावडे, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १५ मे २०२५ रोजी श्री. संतोष राऊत (तत्कालीन उपजिल्हा निवडणूक अधिकारी बीड) यांच्याविरुद्ध शिस्तभंग कारवाईसाठी पत्र जारी केले आहे. या संपूर्ण प्रकरणात मोठ्या आर्थिक अनियमितता झाल्याचा संशय असून, याप्रकरणात सहभागी अधिकाऱ्यांविरुद्ध लवकरच न्यायालयात याचिका दाखल होणार असल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.

**परळी तालुक्यात बौद्धांवर**

आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. दिलेल्या निवेदनानुसार वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे तसेच उपोषण कर्ते रामचंद्र भगवान घाडगे, चंद्रमुनी रामकिशन घाडगे, रामचंद्र दिलीप बनसोडे, हरिभाऊ साधू घाडगे, किशन अच्युत घाडगे यांच्यासह रोहिदास घाडगे, लक्ष्मण घाडगे, नागुराव गायकवाड, दिलीप बनसोडे ,कोंडीराम घाडगे, कमलाकर घाडगे, एडवोकेट विवेक वैद्य, धनंजय घाडगे ,दीपक बनसोडे, सुजित घाडगे, फुलचंद घाडगे, सचिन घाडगे, महेंद्र घाडगे, छगन घाडगे, कालिंदा घाडगे, रेखा घाडगे, कावेराबाई घाडगे, वैजयंती घाडगे, मोहिनी घाडगे, रेखा बनसोडे, मंदाबाई वाव्हळे आदी उपोषणाला बसले आहेत. दरम्यान या उपोषणावर जिल्हा प्रशासन तसेच उपोषण सोडविण्यासाठी आणि कमानीला परवानगी द्यावी यासाठी पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे तसेच आमदार धनंजय मुंडे हे काय भूमिका घेतात याकडेही जिल्ह्यातील बौद्ध समाजाचे लक्ष लागले आहे.दरम्यान या आंदोलनास वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, बहुजन समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष प्रशांत वासनिक यांनी भेट दिली.

**राजेगाव राबवणार लेक**

विनायकराव मेटे साहेबांनी बीड जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात मुलींचा जन्मदर वाढवा याकरिता अजित बालिका योजना सुरू केली होती त्यांचे हे कार्य पुढे नेण्यासाठी लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांचे जन्मगाव असलेल्या राजेगाव येथून मुलींचा जन्मदर वाढवा याकरिता लेक लाडकी ही योजना सुरू करण्यात आली आहे. यात आता गावात जन्मलेल्या मुलींच्या नावे ग्रामपंचायतच्या वतीने ५ हजार रुपये फिक्स डिपॉझिट करण्यात येणार आहे. याकरिता लागणाऱ्या निधीसाठी डॉ. ज्योती मेटे पुढे सरसावल्या असून त्यांनी ग्रामपंचायतीकडे निधीचा धनादेश सोपवला आहे.याप्रसंगी बोलताना डॉ.ज्योती मेटे म्हणाले की लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या निधनानंतर एक गोष्ट मनाशी खुणगाठ बांधली होती या पुढच्या काळामध्ये जो काही पत्नी धर्म आहे. तो निभावत असताना साहेबांना प्रिय असणारी प्रत्येक गोष्ट करायची आणि त्याचाच परिपाक म्हणून त्यांनी मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी सुरू केलेली चळवळ पुढे घेऊन जाण्यासाठी राजेगाव या त्यांच्या जन्म गावापासून लेक लाडकी या योजनेची सुरुवात करत आहोत. असे मत त्यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, प्रदेश सरचिटणीस नितीन लाठकर, जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, आशुतोष मेटे, सरपंच प्रवीण मेटे, लिंबराज वाघ ,डॉ. मनीषा मेटे, डॉ. जयेश दळे, डॉ. अशोक मुंडे, राजकुमार मेटे, युवराज कदम, प्रा. विठ्ठलराव फाटक , प्रा. योगीराज बापू मेटे, राजकुमार मेटे, प्रा. वैशाली मेटे ,शाळेतील मुख्याध्यापिका श्रीमती मोराळे आदीसह मोठ्या संख्येने गावकरी विद्यार्थी उपस्थित होते.

**३२५ उद्योगांना मंजुरी; राज्य मंत्रिमंडळ**

कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. मात्र धोरणाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर प्राप्त झालेल्या विविध घटकांच्या प्रस्तावापैकी राज्याच्या विकासाच्या दृष्टीने फायदेशीर ठरतील अशा घटकांना प्रोत्साहने मंजूर करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली.

**राज्यात नवे गृहनिर्माण धोरण मंजूर**

राज्याच्या नव्या गृहनिर्माण धोरणाला आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. पुढील ५ वर्षात म्हणजे सन २०३० पर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटांसाठी ३५ लाख घरे उभारण्याचा संकल्प या धोरणात केला आहे. यासाठी आखण्यात आलेल्या 'माझे घर, माझा अधिकार' हे ब्रीद अनुसरून वर्ष २०३० पर्यंत राज्यातील प्रत्येक नागरिकाला शाश्वत, सुरक्षित आणि पर्यावरणास अनुकूल घराचे अभिवचन या धोरणाच्या माध्यमातून देण्यात आले आहे. या धोरणात डाटा आधारित निर्णय प्रक्रिया, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, गतिमानता, पारदर्शकता आणि सामाजिक समावेशकता यावर भर दिला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# नाणेनिधीचा पाकला दणका

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकला धडा शिकवला आणि त्याचे दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. या धामधुमीतच आयएमएफ म्हणजे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकला एक अब्ज डॉलरचे कर्ज मंजूर केले होते. पण त्या कर्जाच्या कागदाची शाई वाळण्याआधीच नाणेनिधीने पाकला नव्या अटी लादल्या असून त्यामुळे पाकचा बेल आऊट कार्यक्रम धोक्यात आला आहे. भारतासाठी ही सुखद बातमी आहे. भारताबरोबरच्या तणावामुळे योजनेच्या वित्तीय, बाह्य आणि सुधारणा कार्यक्रमाला धोका होऊ शकतो. १७.६ ट्रिलियन रुपयांच्या नवीन अर्थसंकल्पाला संसदेची मान्यता आणि अन्य जाचक अटी पाकवर लादल्या आहेत. नाणेनिधीचे पाक प्रेम कुविख्यात आहे. पण यंदा मात्र नाणेनिधीकडून पाकला मदत मिळणार नाही आणि मिळाली तरी ती जाचक अटींमुळे असेल असा यात स्वागतार्ह बदल झाला आहे. अर्थात आयएमएफकडून पाकला मदत मिळूनही आतापर्यंत पाकची अर्थव्यवस्था सावरण्यास आणि पाकच्या अर्थव्यवस्थेला चांगले दिवस दाखवण्यास पाक अपयशी ठरला आहे.
पाकच्या आर्थिक समस्या काय आहेत आणि यातून तो कसा मार्ग काढतो यावर आम्हाला रस असण्याचे काहीही कारण नाही. पण पाक आर्थिक संकटात आहे आणि हे बेल आऊट पॅकेज मिळूनही तो आपल्या आर्थिक संकटातून येत नाही हे भारतासाठी मोलाचे आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून वर्षानुवर्षे कर्ज मिळूनही पाक त्याचा उपयोग दहशतवाद्याना पोसण्यात करत आला आहे. अगदी १९४७ पासून पाक अस्तित्वात आल्यापासूनच पाकचे हे धोरण राहिले आहे आणि त्यामुळे त्याला कर्ज देण्यास भारताचा कायम विरोध राहिला आहे. कारण या कर्जाचा उपयोग अर्थात भारताच्या विरोधातच पाक करत आला आहे म्हणूनच इतकी गंगा आली तरी पाक कोरडा तो कोरडाच राहिला आहे. वारंवार कर्ज दिल्यानंतरही पाकच्या आर्थिक स्थितीत सुधारणा का होत नाही असा सवाल भारताने अनेक वेळा उपस्थित केला आहे. पण याला उत्तर आहे की पाक तो सारा पैसा दहशतवाद्यांचे नेटवर्क आणि टेरर फंडिंगसाठी करतो. त्या पैशांचा विनियोग देशांतर्गत अर्थव्यवस्था सुधारण्याकडे होतच नाही. त्यामुळे पाकची ही अवस्था आहे.

पाकवर आता नाणेनिधीने नव्या अटी लादल्या असल्याने पाकचे श्वास घेणे मुश्कील झाले आहे. नाणेनिधीला पाकचे प्रेम खूपच आहे, पण पाकला तीही संघटना वर काढू शकत नाही. नाणेनिधीचा पाकला मदत करण्याचा निर्णय अत्यंत धोकादायक आहे आणि जागतिक मूल्यांच्या सुरक्षेसाठी अतिशय चुकीचा आहे असा इशारा देण्यात आला आहे. पाकिस्तान ३५ वर्षांपासून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून मदतीचा लाभ घेत आला आहे, पण तिचा उपयोग भारताविरोधात केला आहे आणि तरीही पाकला मदत करण्याचे नाणेनिधीचे धोरण चालूच राहिले आहे. वास्तविक नाणेनिधी किंवा संयुक्त राष्ट्रसंघ या संघटना या भारतविरोधी आहेत आणि त्यांचा दृष्टिकोन हा नेहमीच भारतविरोधी विशेषतः विकसनशील देशविरोधी राहिला आहे, हे आतापर्यंत अनेक वर्षे भारत सातत्याने सांगत आला आहे. पण या संघटनांच्या भूमिकेत बदल होत नाही. इतक्या त्या पाश्चात्य राष्ट्रांच्या अधीन झाल्या आहेत. पण आता मात्र पाकला चांगलाच धडा शिकवण्याचा निर्धार नाणेनिधीने केला आहे आणि पाकवर ज्या नव्या अटी लादल्या आहेत त्यामुळे पाकचे कंबरडे पुरते मोडून पडणार आहे. या संघटना कितीही पाक प्रेमी असल्या तरीही त्यांना पाक या आपल्या लाडक्या अपत्याला आता दूर करावेच लागणार आहे अन्यथा या संघटनाच कालबाह्य ठरण्याचा धोका आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर आणि भारताचे सैनिक पाकला धडा शिकवत असतानाही नाणेनिधीने पाकला १.४ अब्ज डॉलरची मदत करण्याचा निर्णय घेतला होता आणि तोही ऐन युद्ध भरात असताना. पण आता नाणेनिधीला उपरती झाली आहे आणि त्याने पाकला नव्या अटी लादल्या आहेत. अर्थात नाणेनिधीला उपरती झाली म्हणून लगेच आपण त्याचे कौतुक करायला नको. कारण पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकला जबरदस्त उत्तर दिले असतानाही आणि पाकचे एअरबेस उद्ध्वस्त केले असतानाही आयएमएफने पाकला १२ हजार कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले. ज्या दिवशी पाकला हे कर्ज मंजूर केले त्याच दिवशी पाकने केलेले देशविधातक कृत्याचा पंचनामा भारताने आंतरराष्ट्रीय समुदायासमोर मांडला होता. नाणेनिधी दुटप्पी आहेच हे त्यातून सिद्ध होत आहे. पण त्याचबरोबर या नव्या अटीमुळे पाकला आणखी एक दणका मिळाला आहे आणि त्यातून तो बाहेर पडू शकणार नाही याची व्यवस्था करण्यात आली आहे. पाकला १९५८ पासून बेल आऊट पॅकेज मिळण्यास सुरुवात झाली. तेव्हापासून पाकला ४४ अब्ज डॉलरचे पॅकेज मिळाले आहे. त्याचा उपयोग पाकने दहशतवाद्यांना पोसण्यात आणि भाराताविरोधात कट कारस्थाने करण्यात केला आहे. त्यामुळे पाकला इतकी मदत करणारा नाणेनिधी हाही भारतविरोधीच आहे. आता पाकने ज्या नव्या अटी लादल्या आहेत त्यातून पाक सावरणे अवघड आहे, कारण त्या अटींमध्ये पाकची अर्थव्यवस्था सुधारण्याचा समावेश आहे, पण उनाड मुलाला जशी अभ्यासाची अट नको वाटते तसेच पाकचे आहे. त्याला केवळ दहशतवाद्यांना पोसणे आणि इतर देशांविरोधात कारवाया करण्यासाठी त्यांना उचकवणे यातच रस आहे. त्यामुळे पाकला निधी देण्याचा निर्णय मुळात चुकीच्या वेळी घेतला आहे. त्याविरुद्ध जोरदार मत प्रदर्शन करण्यात आले आहे. ऑपरेशन सिंदूरपासून आयएमएफने अनेक अटी पाकवर लादल्या आहेत त्यामुळे पाक जरा-जर्जर झाला आहे. पण पाकवर आयएमएफने संरक्षण खर्चावर नियंत्रण आणि दहशतवादाला मदत न करणे या अटींचा समावेश नाही. नेमक्या याचाच फायदा आतापर्यत पाक घेत आला आहे. पण आता तसे तो करू शकणार नाही. आयएमएफनेही आता पाकचे दहशतवादाबद्दल वाटणारे प्रेम लक्षात घेऊन त्या देशाला धडा शिकवला पाहिजे. पाकवर अटी लादतानाच आयएमएफनेही आपण कालबाह्य ठरण्याचा धोका आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

## राशिभविष्य

मंगळवार, २० मे २०२५

**॥ पंचांग ॥**

आज मिती वैशाख कृष्ण अष्टमी शके १९४७. चंद्र नक्षत्र धनिष्ठा. योग एद्र, चंद्र राशी मकर ७.३६ पर्यंत नंतर कुंभ,भारतीय सौर ३० वैशाख शके १९४७ म्हणजेच मंगळवार दिनांक २० मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.०२, मुंबईचा सूर्यास्त ७.०७, मुंबईचा चंद्रोदय १.२५ उद्याची, मुंबईचा चंद्रास्त १२.२२, राहू काळ ३.५१ ते ५.२९, कालाष्टमी, शुभ दिवस

**॥ भविष्य ॥**

**मेष** : प्रवास करावे लागतील.
**वृषभ** : धनलाभ होऊ शकतो.
**मिथुन** : कौटुंबिक सुख चांगले राहील.
**कर्क** : मनस्ताप सहन करावा लागेल.
**सिंह** : कौटुंबिक सुख मिळेल.
**कन्या** : निर्णय स्वीकारावे लागतात.
**तूळ** : अनुकूल कालावधी आहे.
**वृश्चिक** : कार्यात सक्रिय योगदान द्याल.
**धनू** : प्रवास फलदायी होऊ शकतो.
**मकर** : चांगली नोकरी मिळेल.
**कुंभ** : मन प्रसन्न असणार आहे
**मीन** : कौटुंबिक सुख आहे.

# बांगलादेशमधील अवामी लीगवर बंदी...





**अभय गोखले**

बांगलादेशमधील 'अवामी लीग' या सर्वात जुन्या आणि सर्वात मोठ्या पक्षाची स्थापना १९४९ साली झाली. गेल्यावर्षी या पक्षाच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण झाली. या पक्षाने १९५२ साली झालेल्या भाषिक आंदोलनात मोठ्या प्रमाणात भाग घेतला होता. पूर्वीच्या पूर्व पाकिस्तानवर जेव्हा पश्चिम पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी उर्दू भाषेची सक्ती केली तेव्हा त्याला विरोध करण्यासाठी अवामी लीगच्या नेतृत्वाखाली मोठे आंदोलन उभारण्यात आले. त्या आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात अनेक आंदोलक मृत्युमुखी पडले होते.

पूर्व पाकिस्तानातील जनतेला आपली मातृभाषा (बंगाली) अतिशय प्रिय असल्याने, त्यांनी उर्दू भाषेच्या सक्तीला प्राणपणाने विरोध केला होता. पूर्व पाकिस्तान फार काळ पाकिस्तानचा भाग म्हणून राहणार नाही याची प्रचिती १९५२ मधील भाषिक आंदोलनामुळे आली.

भाषिक आंदोलनाचे नेतृत्व अवामी लीगने केल्यानंतर, अवामी लीगच्या पाठीराख्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. अवामी लीगला शेख मुजीबर रेहमान यांच्यासारखे समर्थ नेतृत्व लाभल्यामुळे त्यानंतर झालेल्या आंदोलनांचे नेतृत्व अवामी लीगने केले.

१९६९ साली पाकिस्तानमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत पाकिस्तानच्या नॅशनल असेम्बली अवामी लीगला बहुमत मिळाले आणि सरकार स्थापन करण्यासाठी आपल्याला निमंत्रण मिळेल अशी आशा बाळगणाऱ्या अवामी लीगची मोठीच निराशा झाली.

पूर्व पाकिस्तानातील नेत्याला पाकिस्तानचे पंतप्रधानपद मिळून द्यायचे नाही या इर्षेने पेटलेल्या याह्या खान आणि भुत्तो यांनी अवामी लीगचे नेते शेख मुजीबर रेहमान यांना सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित केले नाही.

अवामी लीगच्या नेतृत्वाने, पाकिस्तानी सरकारसमोर काही मागण्या मांडल्या होत्या, त्या मागण्या मान्य न झाल्याने अवामी लीगच्या नेतृत्वाखाली पूर्व पाकिस्तानमध्ये मोठे जनआंदोलन उभारण्यात आले. ते आंदोलन पोलिसी बळाच्या सहाय्याने चिरडण्याचा निर्णय याह्या खानने घेतला आणि ऑपरेशन सर्च लाईटच्या मोहिमेअंतर्गत पूर्व पाकिस्तानात नरसंहार घडवून आणला. त्यानंतर अवामी लीग आणि मुक्तिवाहिनीने पाकिस्तानी लष्करासमोर कडवे आव्हान उभे केले. नंतर भारताने या संघर्षात मुक्तिवाहिनीला सर्व प्रकारची मदत केल्यामुळे पाकिस्तानी लष्कराला शरण यावे लागले आणि स्वतंत्र बांगलादेशची निर्मिती झाली.

अशा प्रकारे बांगलादेशला स्वातंत्र्य मिळवून देण्यात सर्वात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अवामी लीग या पक्षावर बांगलादेशातील काळजीवाहू सरकारने बंदी घातल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. बांगलादेशचे राष्ट्रपिता शेख मुजीबर रेहमान यांची १९७५ मध्ये हत्या झाली, ऑगस्ट २०२५ मध्ये त्या घटनेला ५० वर्षं पूर्ण होतील. बांगलादेशमधील सध्याचे काळजीवाहू सरकार कट्टरवाद्यांच्या दबावाखाली येऊन निरनिराळे निर्णय घेत आहे. बांगलादेशचे राष्ट्रपिता शेख मुजीबर रेहमान यांना बदनाम करण्याची मोहीम या कट्टरवाद्यांनी चालवली असून, मध्यंतरी त्यांनी शेख मुजिबर रेहमान यांच्या घराची नासधूस केली होती. शेख मुजीबर रेहमान यांचे पुतळे जमीनदोस्त केले होते.

शेख मुजीबर रेहमान यांचा फोटो बांगलादेशच्या करन्सी नोटांवरून हटविण्याचा निर्णय सरकारने घेतल्यानंतर बांगलादेशमध्ये नोटांची टंचाई निर्माण झाली असून, नवीन नोटा चलनात येईपर्यंत ही टंचाई कायम राहण्याची शक्यता आहे.

अवामी लीग या पक्षावर बंदी घालण्याची मागणी जमाते इस्लामी, नॅशनल सिटिझन्स पार्टी आणि इतर संघटनांकडून बऱ्याच दिवसांपासून होत होती. त्याकरीता ढाका येथे या संघटनांनी आंदोलन सुरू केले होते. त्यांनी सरकारला निर्वाणीचा इशारा दिला होता. अखेर त्यांच्या पुढे नमते घेऊन सरकारने अवामी लीगवर बंदी घालण्याचा निर्णय जाहीर केला. दहशतवाद विरोधी कायद्यांतर्गत अवामी लीगवर बंदी घालण्यात आली आहे. यापूर्वी ऑक्टोबर २०२४ मध्ये अवामी लीगच्या विद्यार्थी संघटनेवर बंदी घालण्यात आली होती.

जुलै २०२४ मध्ये आरक्षण विरोधी जे आंदोलन बांगलादेशमधील विद्यार्थी आणि इतर नागरिकांनी पुकारले होते, त्याला हिंसक वळण लागले आणि त्यानंतर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात अनेक आंदोलक मृत्युमुखी पडले. त्याबद्दल शेख हसीना आणि अवामी लीग या पक्षाला दोषी ठरवून त्यांच्यावर न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत, त्या खटल्यांचा निकाल लागेपर्यंत अवामी लीगवरील बंदी कायम राहणार आहे. सध्या बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना या भारतामध्ये वास्तव्य करत आहेत. त्यांचा ताबा मिळवण्यासाठी बांगलादेशकडून अनेक वेळा मागणी करण्यात आली आहे. अवामी लीगचे अनेक नेते बांगलादेश बाहेर पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत.

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खलेदा झिया या नुकत्याच बांगलादेशमध्ये परतल्या आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीने, अवामी लीगवरील बंदीचे स्वागत केले आहे. आरक्षण विरोधी आंदोलनात पुढाकार घेतलेल्या विद्यार्थी नेत्यांनी नॅशनल सिटिझन्स पार्टी या पक्षाची स्थापना केली आहे. या पक्षाने लवकरात लवकर बांगलादेशमध्ये निवडणुका घेण्याची मागणी लावून धरली आहे. खलेदा झिया यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीनेही निवडणुका लवकरात लवकर घेण्याची मागणी केली आहे. मात्र काळजीवाहू सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांनी आधी सुधारणा आणि नंतर निवडणुका असा पवित्रा घेतला आहे. त्यावरून सरकार आणि राजकीय पक्ष यांच्यात संघर्ष झाल्यास परिस्थिती चिघळू शकेल आणि लष्कर प्रमुखांना त्यात हस्तक्षेप करावा लागेल.

गेली १५ वर्षे बांगलादेशमध्ये जो पक्ष सत्तेवर होता, त्या पक्षावर (अवामी लीग) बंदी घालण्यात आल्याने, त्याचे विरोधक जरी खूष असले तरी निकोप लोकशाहीसाठी ही गोष्ट चांगली नाही. शेख हसीना या बांगलादेशच्या पंतप्रधान असताना त्यांनी सर्व लोकशाही मूल्ये धाब्यावर बसवून गैरमार्गाने निवडणुका जिंकल्या होत्या. सर्वात मोठा विरोधी पक्ष असलेल्या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने निवडणुकांवर बहिष्कार घातल्याने त्या निवडणुकांना काही अर्थ उरला नव्हता. आता अवामी लीगवर बंदी घालण्यात आल्याने, जेंव्हा निवडणुका होतील तेव्हा तो पक्ष निवडणूक रिंगणात नसणार. अशा परिस्थितीत त्या निवडणुकांना काय अर्थ असेल हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

# वायू प्रदूषण एक अनभिज्ञ सत्य!





**डॉ. महालक्ष्मी वानखेडकर**

हल्ली सारखे ऐकायला मिळते की, हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. लहान मुलांना सुद्धा ॲटॅक येत आहे. का बरं? यावर संशोधन केल्यानंतर सर्वांप्रमाणे एकच ठोकताळा... श्वास घ्यायला होत नव्हता कारण कफ, इतर आजारपण, मानसिक त्रास, चिंता अनेक कारणे समोर आली. याचं कारण आपल्याला माहीत असले तरी पण आपण त्यावर मात करू शकत नाही, कारण आपण आता खूप पुढे गेलो आहोत. जेंव्हा मी खोलवर जाऊन यावर संशोधन केले तेव्हा एकच उत्तर मिळाले वायू प्रदूषण. हे एक अनभिज्ञ सत्य आहे.

पृथ्वीभोवती वातावरणाचे मुख्यतः ५ थर आहेत. O3 रेणूपासून तयार झालेला पृथ्वीच्या वातावरणातील 'ओझोन' हा एक वायू आहे जो पृथ्वीच्या वातावरणातील दुसरा थर असून त्याची निर्मिती नैसर्गिकरीत्या झाली आहे. ज्याची उंची ७.५ ते ३० मैलांपर्यंत आहे. यातील ओझोनचा थर हा सूर्यकिरणातील हानिकारक अतिनील किरणे शोषून घेतो. यामुळे आपल्या पृथ्वीवरील सजीव सृष्टीचे रक्षण होते. ओझोनचा उपयोग निर्जंतुकीकरण करणे, जलशुद्धीकरण करणे यासाठी होतो. पृथ्वीच्या वातावरणातील वायूचा एक गट आहे ज्यामध्ये इन्फ्रारेड किरणोत्सर्ग शोषण्याची क्षमता असते. म्हणजेच "हरितगृह वायू". हरितगृह वायू हा वातावरणातील उष्णता अडकवून ठेवतो त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते. हा हरितगृह वायू पृथ्वीला उबदार ठेवतो. कार्बनडाय-ऑक्साइड, पाण्याची वाफ, मिथेन, नायट्रोसॉक्साईड यांच मिश्रण म्हणजे हरितगृह वायू.

या पृथ्वीवर अद्भुत शक्तीने नैसर्गिकरीत्या सर्वच सजीव सृष्टीसाठी पूरक अशीच नैसर्गिक संरक्षणात्मक संयोजना केली आहे. सर्व सजीव सृष्टीतील मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी ज्या काही योजना आखल्या त्यातून या निसर्गाचा फक्त विध्वंस झाला आहे. त्यातील सर्वात मोठा हा प्रदूषण या मार्गाने होत आहे आणि तो सातत्याने केला जात आहे.

'वायू प्रदूषण' म्हणजे द्रव कण, धुळीचे घनकण आणि हानिकारक वायूचे मिश्रण. त्यासाठी अनेक स्त्रोत आहेत. अगदी घरातील देवपूजेपासून ते स्वयंपाक, वीज निर्मिती वाहतुकीकरण, कचरा जाळणे, शेतीमधील विविध कार्य पद्धती, वीज निर्मिती, औद्योगिक चिमण्या, बांधकाम आणि उच्च कोटींचे म्हणजे युद्ध असे अनेक स्त्रोत या वायू प्रदूषणास कारणीभूत आहेत. म्हणजे आपण २४ तास पूर्णपणे घेणारा अमृततुल्य श्वास हा पूर्णपणे विषारी आहे. मानवी क्रियाकलापांमुळे दिवसेंदिवस या प्रदूषणासोबत ओझोनचा थर कमी होत चाललाच आहे. जर याची अतिनील किरणे मानवापर्यंत पोहोचली, तर येथील इतर घटकांचा अंत होणारच; परंतु मानवाची रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊन अनेक रोगांनी ग्रस्त होईल ज्यावर औषधं सुद्धा काम करणार नाहीत आणि शेवट अंत.

मूलभूत मानवी हक्क अनेक आहेत त्यातीलच एक शुद्ध हवा; परंतु आरोग्यासाठी सर्वात मोठा असणारा धोका जो वायू प्रदूषणामुळे निर्माण होतो तो म्हणजे हृदयविकाराचा झटका. आता हृदयविकाराचा झटका हा खूप सहज झाला आहे. त्यातून जगण्याची शाश्वती नाहीच. आत्ताच्या काळात व्यायाम करणाऱ्यांना सुद्धा हृदयाचा झटका येतो त्याचे कारण प्रदूषित हवा. जंगलांपेक्षा शहरात सर्वच प्रकारचे प्रदूषण अति प्रमाणात झाले आहे. विशेषतः कोरोना नंतर झालेल्या प्रदूषणामुळे हार्ट स्ट्रोक हे अति प्रमाणात वाढले आहेत. आपण केलेले चुकीचे प्रकल्प म्हणजे पर्यावरणाला हानिकारक असे असल्यामुळे पूर्ण वातावरणातील कितीही प्रयत्न केला, तरी वायू प्रदूषण जे अति प्रमाणात होत आहे ते आटोक्यात येऊच शकत नाही. कारण आपल्या सुखसोयी या आपण इतक्या गंभीरपणे घेतल्या आहेत की, तिथे आपल्या मृत्यूला किंमत शून्य झाली आहे. ज्याचा आपण विचारच करत नाही. WHO नुसार वायू प्रदूषणाला या शतकातील सर्वात मोठा जागतिक आरोग्य धोका म्हणून ओळखला जातो. कारण या वायू प्रदूषणाच्या संपर्कात आल्यामुळे जगभरात सुमारे अंदाजे ४.५ दशलक्ष अकाली मृत्यू होतात. २.५ मायक्रोमीटरपेक्षाही कमी व्यासाचा प्रदूषक असणारा सूक्ष्म कण रक्त प्रवाहात प्रवेश करू शकतो. ज्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधीत श्वसनरूप आणि कर्करोग होतात. दिवसेंदिवस या विश्वातील प्रत्येक देशात या वायू प्रदूषणामुळे श्वास घेण कठीण होईल, श्वसनाचे अनभिज्ञ असे आजार निर्माण होतील.

वायू तत्त्वाला प्राण का म्हटले जाते? या वायू तत्त्वामुळे शुद्ध हवा जेव्हा प्रत्येक सजीवाच्या शरीरात प्रवेश करते तेंव्हा ती शरीरामधील रक्तप्रवाह शुद्धीकरण करत असते. जेंव्हा रक्त प्रवाह सुरळीत चालतो तेंव्हा आपले हृदय व्यवस्थित कार्य करते. म्हणजेच आपण परत मोकळा श्वास घेतो. हे चक्र प्रत्येक सजीव सृष्टीला जगवते आणि जर ही हवा अशुद्ध असेल, तर रक्ताभिसरण प्रक्रियेत अडथळा निर्माण होऊन लहान मेंदूकडून मोठ्या मेंदूकडे रक्तप्रवाह होऊ शकत नाही शिवाय हृदयापर्यंत सुद्धा रक्त व्यवस्थित पोहोचू शकत नाही. ताजी आणि शुद्ध हवा सर्वच सजीव सृष्टीसाठी एक पोषक तत्त्व आहे ज्यामुळे आपल्या आरोग्याला होणारे फायदे नखशिखांत आहेत.

वृक्ष लागवडीला महत्त्व यासाठी आहे की वनस्पती कार्बन डाय-ऑक्साइड शोषून घेतात आणि ऑक्सिजन टाकतात. जो या सजीवसृष्टीसाठी आवश्यक आहे. आत्ताच्या काळात पर्यावरण पूर्णपणे अशुद्ध झाल्यामुळे आपण कितीही प्राणायाम केले तरीही घेणाऱ्या श्वासात विषारी द्रव्य ही शरीरात जातातच. थोडक्यात काय तर या पृथ्वीवरील वायू प्रदूषणामुळे तापमान वाढून अनेक निकृष्ट तत्त्वेही या भूमीत, महासागरात, हवेत मिसळत आहेत. परिणामी सजीव सृष्टीवर होणारे घातक परिणाम. हवा शुद्धीकरणाच्या सरकारकडे अनेक प्रकल्प योजना आहेत; परंतु त्याचबरोबर प्रदूषित करण्याच्या सुद्धा वाटा आहेत. शहरांमध्ये हवा गुणवत्तेसाठी नियोजन आहे; परंतु शहरातील नागरिकांचा सहभाग यासाठी आहे का? या पृथ्वीवरील पर्वत हे प्रदूषण मुक्त करणारे सर्वात मोठे स्त्रोत आहे असे असताना आपण या पर्वताचा आपल्या प्रगतीच्या दृष्टीने हानीकारक प्रकल्प योजना करून आपल्याच हाताने आपला मृत्यू ओढवून घेत आहोत की नाही? या पंचतत्त्वांनी परिपूर्ण असणाऱ्या पृथ्वीचा विनाश हा आपण करीत आहोत.

# बालकांना जबाबदारीची जाणीव ; व्हावी खुली चर्चा



चिंतन, मनन करून पालक दमले, पण कौमार्य अवस्थेतील बालकांना आवर घालण्यात कमीच पडत आहेत. बालकांची प्रत्येक बाबतीतील curiosity इतक्या टोकाला पोहोचली आहे की त्यापुढे परिणामाचा विचार करण्याची सद्सदविवेक बुद्धी कामचं करत नाहीये. एकमेकांना चॅलेंज देणे आणि ते चॅलेंज जिंकण्यासाठी कुठल्याही पातळीवर जाण्याचे धाडस करणे ही बाब अनेक गंभीर घटनाकडे बालकांना वळवत आहे. याचे चिंतन होणे आणि प्रभावी उपाययोजना शोधणे आवश्यक झालं आहे.

काही मुद्दे परत परत विचारात घेणे महत्त्वाचे आहे. बालकं अशी का वागतात? हा प्रश्न प्रत्येक पालकांना पडतो आहे. पालक-बालक यांच्यातील दरी ही काही नवीन नाहीये. पालक-बालक यांच्यात वैचारिक द्वंद सुरूच आहे आणि काळानुसार सगळ्या संकल्पना बदलत जाणारचं आहेत. पालकांना ज्या गोष्टी खूप गंभीर वाटतात त्या बालकांना तितक्याशा गंभीर वाटतं नाही. नीतिमत्ता, प्रामाणिकपणा या सगळ्यांचा फारसा प्रभाव आता बालकावर दिसून येत नाही. बालक आपल्या पालकांच्या विचारांशी त्यांनी जपलेल्या नियमांशी तितकेसे जोडलेले पण नाही. ज्यांच्या घरी कधी कोणी डान्स बारमध्ये गेल्याचा इतिहासच नाही किंवा त्याचं नाव देखील घरी काढलं जात नाही अशा घरची एक बालिका आपल्या मित्रासोबत घरी काहीही न सांगता जात असे. तिच्या सोबत तिथे वाईट प्रकार घडला आणि नंतर ती स्वतःच तिकडे कुतूहल म्हणून गेली होती. तिला कोणीही जबरदस्ती तिथे घेऊन गेले नव्हते ही माहिती समोर आली. पण तिथे तिच्या सोबत जे घडले ते तिच्या मर्जीने नव्हते त्यात तिची इच्छा सामील नव्हती हे बालिकेने सांगितले. अर्थात तिथे जाणे हे काही वाईट वगैरे नाही, असे विचार बालिकेने तिच्या मित्र-मैत्रिणींकडून ग्रहण केले होते आणि ते तिला बरोबर वाटले होते. म्हणून ती तिथे गेली इथपर्यंत तिला तिचं काही चुकलं असे नाही वाटले आणि पुढे जे काही झाले ते तिच्या सोबत चुकीचे झालं असं तिचं सांगणं होतं. जे घडलं तो गुन्हा होताच पण हा टाळता आला असता हे पालकांचे विचार होते. यात नेमकं द्वंद काय तर चूक बरोबर या संकल्पनामध्ये होत जाणारा बदल. या बदलामुळे पालक-बालक यांच्यात निर्माण होत जाणारी दरी. ही दरी डोहात रूपांतरित होत जाते आणि पालक बालकांच्या विश्वातून खूप लांब होत जातात. बालक आपल्याभोवती एक कोश निर्माण करतात आणि त्यात पालकांना प्रवेश नसतो.

एक बाळ जन्माला येतं त्या क्षणापासून पालकांकडे अनेक गोड स्मृती असतात बालकांच्या. कालांतराने या स्मृती फक्त पालकांच्या होऊन जातात. बालक त्याच्या वाढत्या वयानुसार ते विसरत जातं. जन्म झाल्यापासून तर सहा ते सात वर्षांपर्यंत बालकांना विशेष काही आठवत नसतं हे शास्त्र सांगतं. त्या काळातील स्मृती फक्त पालकांच्या

**डॉ. राणी खेडीकर**

**अध्यक्ष, बाल कल्याण समिती पुणे**

असतात. पुढे कालांतराने बालकांसाठी त्या त्यांच्या पालकांनी सांगितलेल्या सत्य कथा असतात. स्मृती म्हणून त्यांच्याशी ते जोडलेल्या नसतात. एखाद्या कुटुंबात खूप बिंबवून काही गोष्टी सांगितल्या जातात पण नेमकी तीच रेष बालक ओलांडतात का तर curiosity म्हणून. आता यावर उपाय काय करायला हवे हा प्रश्न शिल्लक उरतोच. पालकांचे बालकाशी कितीही मैत्रीपूर्ण संबंध असले तरी काही गोष्टी तो लपवणारच हे निश्चित आहे. म्हणून आपण पाळलेले आदर्श त्यांनी पाळावेच याचा अती आग्रह न धरता ते पाळले नाही, तर कुठले संभाव्य धोके होऊ शकतात, त्यातून बाहेर पडण्यासाठी काय करावं आणि स्वतःला सुरक्षित कसं ठेवावं याची खुली चर्चा व्हायला हवी. चर्चेदरम्यान पालकांनी बालकांना बोलण्याची व्यक्त होण्याची संधी द्यावी. आधीच एखाद्या बाबतीत नकारात्मक विचार पालकांकडून व्यक्त होत असतील, तर बालक त्यावर काहीही बोलणार नाही. म्हणून खुली चर्चा होणं, ती घडवून आणणं आवश्यक आहे. आपल्या बालकाकडून इतरांना गंभीर ईजा होऊ नये आणि त्याला पण काही नुकसान होऊ नये याची माहिती न चिडता, रागावता चर्चेतून बालकापर्यंत पालक पोहोचवू शकले, तर खूप धोके टाळता येतील. इतरांच्या भावनांची जाणं असणं, दुसऱ्याचा त्रास कळणं. हा माणूस असण्याचा पुरावा आहे. ही गोष्ट बालकामध्ये रुजविण्याची पद्धत बदलण्याची गरज आहे. यासाठी बालकांचे समाजीकरण योग्य मार्गाने व्हायला हवं आहे. प्रत्येक पिढीतील व्यक्तीशी बालकांनी बोलायला हवंय. आज आपण बघतो, बालक केवळ त्यांच्या वयातील बालकांशी जास्त संवाद साधतात किंवा फार तर थोड्या मोठ्या बालकांशी बोलतात. ते ही प्रत्यक्ष कमीच. अनुभवांची कक्षा मोठी असलेली व्यक्ती बालकांच्या संपर्कात असली तरी त्यांच्याशी बोलणं त्यांना फारसं आवडत नाही. कारण ते अनुभव केवळ लेक्चर म्हणून आपल्यापर्यंत येत आहेत याची जाणीव बालकास होते आणि त्याला ते नकोसं वाटतं. म्हणून हे अनुभव खुली चर्चा मोकळं बोलणं फक्त शेअरिंग या अंगाने असेल, तर ते बालकाकडून स्वीकारलं जातं. कदाचित जो धडा घ्यायचा तो त्यांचे ते घेतात, पण जर आपण आग्रह कमी केला तर...

## तापलेल्या तव्यावर पोळी भाजण्याचा प्रकार





भारतीय लष्कराने केलेल्या ऑपरेशन सिंदूर या धडक कारवाईमुळे पाकिस्तानचे कंबरडे मोडले खरे पण या मोहिमेचा वापर करून घेण्यात प्रसिद्धीलोलुप मात्र आघाडीवर राहिले. अनेक चित्रपटनिर्मात्यांनी 'ऑपरेशन सिंदूर' या शीर्षकासाठी नोंदणी केली. एकाने तर तसे पोस्टरच रिलीज केले. वृत्तवाहिन्या, तर पाकिस्तानचे नामोनिशाण मिटवण्याच्या बातम्यांचा रतीब टाकत होत्या. त्यातच भाजपा आता याच मोहिमेला केंद्रित करून दहा दिवसांची तिरंगा यात्रा काढणार आहे. समाजमाध्यमांवरील ट्रोलर्सना, तर ऑपरेशन सिंदूरनंतरची शस्त्रसंधी नको होती आणि ती जाहीर करणाऱ्या परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांना व त्यांच्या कुटुंबीयांना अर्वाच्य भाषेत ट्रोल करून भंडावून सोडले. मध्य प्रदेशातील भाजपाचे वरिष्ठ नेते आणि मध्य प्रदेश सरकारचे मंत्री विजय शाह म्हणाले की, ज्यांनी भारताच्या मुलींना विधवा केले त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्याच बहिणीच्या मदतीने धडा शिकवला. "(उनकी समाज की बहन के जरीये)". यात त्यांनी नाव घेतले नसले तरी त्यांचा रोख लष्करी अधिकारी सोफिया कुरेशी यांच्याकडे होता हे वेगळे सांगायला नको. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना ऑपरेशन सिंदूरविषयी संबोधित करताना भारतीय सैन्यदलाच्या सामर्थ्याविषयी भाष्य केले आणि त्यांचे कौतुकही आदमपूर येथील हवाई तळाला प्रत्यक्ष भेट देऊन केले. पंतप्रधानांचाच कित्ता गिरवत भारतीयांनी भारतीय सैन्यदलाविषयी अभिमानाची भावना प्रकट केली असताना प्रसिद्धीलोलुपांचे वागणे मात्र खटकले.

– **दीपक काशिराम गुंडये,** वरळी.

## फेरीवाला शाप की वरदान ?

फेरीवाले प्रत्येक रेल्वे स्थानकाच्या बाहेर जो आवाज गोंगाट सुरू असतो, सौ का देड किलो, पचास का आधा कीलो, तो म्हणजे फेरीवाले... रेल्वे स्थानकाबाहेर पडल्यावर चालण्यास ज्याच्यामुळे कसरत करावी लागते ते म्हणजे फेरीवाले... एखाद्या वस्तूची किंमत विचारून ती न घेता पुढे गेले तर नही लेने का तो खालीफिली भाव क्यों पूछते है म्हणतो ते फेरीवाले... कधीतरी भावाच्या घासाघीस वरून दोघांचा वाद भांडणावरून मारामारीपर्यंत जातो ते म्हणजे फेरीवाले... काही लोकांना रेल्वे स्थानकाबाहेर पडल्या पडल्या खरेदी करून सोयीस्करपणे बस रिक्षा टॅक्सी पकडून लवकर घरी पोहोचता येते ते म्हणजे फेरीवाले... तर काही लोकांना यांच्यामुळे दुकानापेक्षा चारपैसे कमी पडतात आणि पैसे वाचतात उपयोगी पडतात ते म्हणजे फेरीवाले... रस्त्यावर चिरीमिरी देऊन धंदा करतात त्यामुळे ग्राहकांना कमी भावात विक्री करतात ते म्हणजे फेरीवाले, पण आवर्जून सांगायचे म्हणजे यात मराठी धंदेवाला शोधून सापडत नाही ते म्हणजे फेरीवाले... सामान स्वस्त पण कायम वाद, रेल्वे स्थानकाबाहेर उपलब्ध पण रस्ता जाम, गोंगाट, गोंधळ, अडचण आणि सोपे सोयीस्कर स्वस्त. मला कळतच नाही, फेरीवाला शाप की वरदान...

– **मयूर प्रकाश ढोलम,** जोगेश्वरी

## काव्यकोडी



**एकनाथ आव्हाड**

### डोंबाऱ्याचा खेळ

आज या गावाला,
तर उद्या त्या गावाला
डोंबाऱ्याचा खेळ आला
चला जाऊ पाहायला

ढोलकीचा आवाज
कानावर जेव्हा पडतो
छोटासा पोरगा
दोरीवर मग चढतो

छान धरतो ठेका
तो ढोलकीच्या तालावर
रस्त्यावर चालावे तसा
सहज चाले दोरीवर

केवढे थरारक खेळ
नवे नवे तो दाखवतो
अंगावर येतो काटा
थरकाप जिवाचा उडतो

पोटाची खळगी भरण्या
होई जिवावर उदार
चार पैसे मिळवून
उचले कुटुंबाचा भार

जगण्यासाठी गावोगावी
नाचतो हा डोंबारी
डोंबाऱ्यांच्या पोराला आता
शाळाच देतेय उभारी

१) हात नाही, पाय नाही
लांबीने छोटा-मोठा
त्याला पाहताच अंगावर
सरसरून येतो काटा

शेतकऱ्यांच्या मित्राचे
एक नाव भुजंग
नागमोडी आकारात
कोण सरपटतो सांग?

२) स्वभावाने भित्रा
पळण्यात चपळ
शत्रू दिसताच
लगेच काढे पळ

दिसायला सुंदर
जंगलात दिसती फार
सांबर, चितळ
हे कोणाचे प्रकार?

३) बगळ्यासारखे
रूप त्याचे असे
पाणथळ जागेत तो
फिरताना दिसे

लांब मान, लांब पाय
चोच देखील लांब
कोणता हा पक्षी
नाव त्याचं सांग?

उत्तर -
१) साप
२) हरिण
३) करकोचा

eknathavhad23 @gmail.com

## बक्षीस जिंका

चित्र रंगवून ई-मेल करा आणि बक्षिसे जिंका चित्रासोबत नाव व पत्ता लिहून पाठवणे.

kilbil@prahaar.co.in

**चित्र रंगवा आणि बक्षीस मिळवा...**

चित्र रंगवून कात्रण ई-मेल करा अथवा टपालाद्वारे गुरुवारपर्यंत पाठवणे.

स्पर्धकाचे नाव, फोटो शाळेचे नाव व ठिकाण, इयत्ता, घरचा पत्ता आणि संपर्क क्रमांक.

सर्वोत्कृष्ट चित्र रंगवणाऱ्या विजेत्याला बक्षीस आणि प्रसिद्धी दिली जाईल.

प्रहारचे कर्मचारी आणि त्यांच्या परिवारास स्पर्धेत भाग घेता येणार नाही.





**चित्र रंगवा विजेती :** अवनी मंदार कोठावळे
**शाळा :** जि. प. पूर्ण प्राथमिक शाळा कसबा वाघोटण, ता- देवगड, जि- सिंधुदुर्ग



**परीक्षक :** मनिषा दिवाकर जाधव
मुख्याध्यापिका
सुषमा पाटील विद्यालय व ज्यु. कॉलेज, कामोठे. नवी मुंबई.





# उन्हाळा कसा होतो?

**कथा** — **प्रा. देवबा पाटील**



त्या दिवशी सकाळी स्वरूपच्या आई-बाबांना व आजोबांनासुद्धा स्वरूप आज सकाळी काही लवकर उठणार नाही असे वाटले. त्यांना वाटले आळशी स्वरूप आज सकाळी एवढ्या लवकर कशाचा उठतो. मस्त झोपून राहिला असेल. पण ते सकाळी झोपेतून उठले व दात घासू लागले, तर स्वरूपची स्वारीसुद्धा डोळे चोळत चोळत बाहेर आली व आपले दात घासू लागली. सर्वांना नवल वाटले व आनंदही झाला. बाकीच्यांप्रमाणे स्वरूपने स्वतःच स्वेटर घालून, कानांना व डोक्याला मफलर बांधून, मोज्यांसह पायात बूट घालून आपली तयारी केली व आजोबांसोबत फिरायला जाण्यासाठी सज्ज झाला.

"झाली बाळा तयारी?" आजोबांनी विचारले.

"हो आजोबा. तुमच्यासोबतच झाली." स्वरूपने उत्तर दिले.

"मग निघायचे का आपण फिरायला?" आजोबांनी पुन्हा प्रश्न केला.

"हो आजोबा. चला निघू या." स्वरूप उत्तरला.

"चल." आजोबा म्हणाले व ते दोघे नाताजले फिरायला जाण्यासाठी कालच्यासारखे आजही सकाळी आपल्या घराबाहेर पडले. घरापासून थोडे पुढे जात नाही तोच स्वरूपची प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली.

"बर्फ हिवाळ्यातच का पडतो आजोबा?" स्वरूपने प्रश्न केला.

आनंदराव म्हणाले, "स्वरूप, तुझी विचारशक्ती खूप चांगली आहे बाळा. आता तू मला सांग एकूण ऋतू किती आहेत?" आजोबांनी स्वरूपला प्रश्न टाकला.

"तीन आहेत आजोबा." स्वरूपने उत्तर दिले.

"कोणकोणते तीन ते सांग बरे?" आजोबांनी पुन्हा विचारले.

"पावसाळा, हिवाळा व उन्हाळा." स्वरूपने सांगितले.

"बरोबर. आपल्या देशात तीन ऋतू आहेत. ते कसे होतात हे तुला माहीत आहे का?" आजोबांनी विचारले.

"नाही आजोबा. आधी मला हे ऋतू कसे होतात ते सांगा बरं." स्वरूप म्हणाला.

"बरे आधी ते सांगतो." आजोबा सांगू लागले, "बघ, आपली पृथ्वी ही स्वतःभोवती फिरतांना सूर्याभोवती सुद्धा फिरत असते हे आपणां सर्वांना माहीतच आहे. कधी दक्षिण गोलार्ध सूर्याकडे असतो, तर कधी उत्तर गोलार्ध सूर्याच्या बाजूस असतो. तसेच फिरतांना पृथ्वीचा आस थोडासा कलता म्हणजे झुकता असतो."

"आजोबा हे गोलार्ध म्हणजे काय असतात." स्वरूपने शंका काढली.

आनंदराव म्हणाले, "पृथ्वीच्या मध्यभागातून जाणाऱ्या उत्तर आणि दक्षिण ध्रुवांना जोडणाऱ्या काल्पनिक रेषेला पृथ्वीचा अक्ष म्हणतात. या अक्षाभोवती पृथ्वी फिरते. या अक्षाच्या पृष्ठभागावरील वरच्या टोकाला उत्तर ध्रुव, तर खालच्या टोकाला दक्षि ध्रुव म्हणतात. गोलार्ध म्हणजे अर्धा गोल भाग. उत्तर ध्रुवाकडील अर्ध्या गोल भागाला उत्तर गोलार्ध, तर दक्षिण ध्रुवाकडील अध गोल भागाला दक्षिण गोलाध म्हणतात. पृथ्वीचे उत्तर व दक्षिण गोलार्धात विभाजित करणाऱ्या पृथ्वीच्या पृष्ठभागावरील आडव्या वर्तुळाला पृथ्वीचे विषुववृत्त म्हणतात."

आनंदराव पुढे सांगू लागले, "तर पृथ्वी स्वभोवती फिरतांना तिच्या अक्षार्श थोडी कलती होऊन फिरत असते. ती य कललेल्या अवस्थेतच सूर्याभोवतीही फेरं मारत असते. त्यामुळे तिचा काही भाग सूर्याकडे कलतो म्हणजे सूर्याच्या जवळ येतो, तर त्याविरुद्धचा भाग सूर्यापासून थोडा दूर जातो. म्हणजेच पृथ्वीचा उत्तर गोलार्ध कधी सूर्याच्या जवळ जातो, तर कधी दक्षिण गोलार्ध सूर्याच्या जवळ जातो. दर सहा महिन्यांनी ही स्थिती बदलते व वर्षातून त्या दोन दिवशी सूर्य पृथ्वी अंतर सारखेच असते. पृथ्वीच्या कलण्यामुळे पृथ्वीवर सूर्यकिरण हे नेहमी तिरपे पडतात. तिरपेपणाने ते पृथ्वीवर कमी-जास्त प्रमाणात पडतात. सूर्याकडील ज्या जवळच्या भागावर ते सरळ लंबरूप पडतात त्या भागाचे हळूहळू तापमान वाढू लागते व त्या भागात ऊन तापू लागते आणि तिकडे उन्हाळा ऋतू सुरू होतो. म्हणजेच जो गोलार्ध सूर्याकडे असतो त्याला सूर्याची उष्णता भरपूर प्रमाणात मिळते व त्या भागाचे तापमान खूप वाढून त्यावेळी त्य भागात उन्हाळा ऋतू सुरू होतो."

"चल, आता परत फिरायला काही हरकत नाही. आपण घराकडे वळू या." आजोबा असे म्हणाले व ते घराकडे परतले.

# आजीबाई... एक चिंतन

**कथा** — **रमेश तांबे**



संध्याकाळची वेळ होती. मी आणि माझा मित्र मुंबईतील दादरच्या बाजारपेठेतून भटकत होतो. रस्त्यावर गाड्यांची गर्दी प्रचंड होती. फुटपाथवर किरकोळ विक्रेते आपापली दुकाने थाटून बसले होते. समोर चकचकीत दुकाने, त्या दुकानातला विजेचा झगमगाट, ग्राहकांची गर्दी यामुळे सारा परिसर अगदी फुलून गेल्यासारखा वाटत होता. आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या उंच उंच इमारती, त्यांची वेगवेगळी, नव्या स्वरूपातील बांधणी, नव्या स्थापत्यकलेची ओळख करून देत होती. नाट्यगृहे, शाळा, विविध संस्थांचे शिकवणी वर्ग आणि दिमाखात झळकणाऱ्या जाहिराती दिसत होत्या. एकूणच सर्व वातावरण उत्साहवर्धक, सुबत्तेचे आणि प्रगतीचे नवे मापदंड गाठणारे!

एका उंच हॉटेलात चहापाणी आणि मनसोक्त गप्पा मारून मी आणि माझा मित्र पुन्हा एकदा दादर भागात भटकंती करू लागलो. समोरच मुंबईतील अनेक राजकीय आणि सामाजिक चळवळीचं केंद्र असलेले शिवाजी पार्क मैदान! येथून अनेक नव्या चळवळींचा जन्म झाला. अनेक वैचारिक वादविवाद झडले. महाराष्ट्राला पुरोगामी घडवण्यात या मैदानाचाही भला मोठा वाटा नक्कीच आहे. तिथल्या कठड्यावर आम्ही दोघेही बसलो. आमच्या गप्पा थोड्याशा तात्त्विक, राजकीय आणि समाजातील अंधश्रद्धा यामुळे समाजाचे होणारे नुकसान यावर सुरू होत्या.

तेवढ्यात, अंधश्रद्धा या समाजात किती खोलवर टिकून आहेत, त्याचा प्रभाव समाजात किती खोलवर रुजलेला आहे आणि आपली प्रगती, आपला वैज्ञानिक दृष्टिकोन किती तकलादू आहे याचाही प्रत्यय आला. मोठमोठ्या गप्पा मारून स्वतःला आधुनिक, विचारवंत असे समजणारे आम्ही दोघेही त्या प्रसंगाने पुरते जमिनीवर आलो. नव्हे नव्हे आपटलोच! त्याचं असं झालं. एक साठी-सत्तरीची आजीबाई आणि तिची आठ-दहा वर्षांची नात दोघी रस्त्याने येत होत्या. तेवढ्यात त्यांना एक काळी मांजर आडवी गेली आणि ती मांजर बरोबर आम्हा दोघांसमोर येऊन उभी राहिली. आता पुढे जायचे कसे? हा प्रश्न आजीबाईंना पडला. ती आमच्या समोर येऊन मांजरीला हाकलू लागली. पण हाय रे दैवा! मांजर जागची हालेना आणि आजीबाईलाही पुढे जाता येईना. दोन-चार मिनिटे इकडे तिकडे घुटमळत राहून अनेक वेळा मांजरीला हाकलण्याचा प्रयत्न करून फसल्यावर आजीबाई आपल्या नातीसह तिथेच उभ्या राहिल्या.



आम्ही दोघेही ते नाट्य बघत होतो. तितक्यात मी तिथून उठलो. त्या मांजरीला उचलले आणि रस्त्याच्या पलीकडे नेऊन ठेवले. माझी कृती पाहून आजीबाईंचा चेहरा फुलला. त्या माझ्याकडे पाहून हसल्या आणि थँक्स म्हणून पुढे निघाल्या. तोच त्यांच्या नातीने प्रश्न विचारला, "आजी, मांजर आडवी गेली तर काय होतं गं?" आजीने नातीच्या डोक्यावर हलकेच टपली मारली आणि म्हणाली, "चल नसते प्रश्न विचारू नकोस!"

घडल्या प्रसंगाने आम्ही दोघे अचंबित झालो. मुंबईसारख्या जागतिक शहरात, दादरसारख्या उच्चभ्रू भागात एका सधन कुटुंबातील आजीबाई मांजर आडवी गेली म्हणून चक्क पाच मिनिटे थांबून राहिल्या. त्याच्या एकंदरीत राहणीमानावरून त्या शिकलेल्या नक्कीच असाव्यात असे वाटत होते. अशा आजीबाई आपल्या नातीसमोर कोणता आदर्श ठेवू इच्छित होत्या. अंधश्रद्धा लोकांच्या मनातून काढून टाकण्याचे काम किती अवघड आहे याची पुन्हा एकदा प्रचिती आम्हा दोघांना आली.

मग आम्ही दोघेही स्टेशनच्या दिशेने चालू लागलो. पुढे समोरच्या गल्लीत हारा-फुलांच्या दुकानासमोर असलेली मोठी गर्दी पाहिली. रस्त्यावरून जाताना भर रस्त्यात थुंकणारी, कचरा टाकणारी माणसं दिसली, उगाचच पॅ पॅ आवाज करत जाणाऱ्या गाड्या पाहिल्या. पोलिसांशी हुज्जत घालणारे गाडीवाले, फुटपाथ अडवून बसलेले फेरीवाले पाहिले. एकविसाव्या शतकातील भौतिकदृष्ट्या समृद्ध भारत आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेला, वाहतुकीचे, स्वच्छतेचे साधेसाधे नियम न पाळणारा अन् अंधश्रद्धेत गुरफटलेला माणूसही दिसला. अजून आपल्याला समाज म्हणून, देश म्हणून बराच मोठा पल्ला गाठायचा आहे ही जाणीव आम्हाला झाली.

# मृगजळ



**प्रतिभारंग** — **प्रा. प्रतिभा सराफ**



वाळवंट म्हणजे काय, हे आपण लहानपणी शाळेतल्या अभ्यासक्रमात शिकलेलो असतो. कधी एखाद्या सिनेमातून वाळवंट पाहिलेला असतो. त्यामुळे वाळवंट म्हणजे पाण्याची कमतरता असणारे जगण्यास अतिशय कठीण असलेले ठिकाण, हे आपण जाणतो पण तरीही तिथेही काही वनस्पती, माणसे, प्राणी जगतातच! कितीही कष्टप्रद जीवन असेल तरी ते, तो वाळवंट सोडून जात नाहीत.

लहानपणी एक हिंदी चित्रपट पाहिल्याचे आठवते. या चित्रपटातील कथानकाला वाळवंटाची पार्श्वभूमी आहे. या सिनेमातील एक संवाद मला आठवतोय. कुठूनतरी एका कुटुंबाला अर्धी बादली पाणी मिळते. त्या चित्रपटातील नायक नायिकेला अंघोळ करून घे, म्हणून सांगतो. नायिका नायकाला म्हणते की मी दोन महिन्यापूर्वीच अंघोळ केलेली आहे तर तू करून घे.

हे पाहून आपल्याला तिथल्या पाण्याचे दुर्भिक्ष लक्षात येते. अलीकडेच आणखी एक कथा वाचनात आली. एकदा एक माणूस वाळवंटात फिरायला गेल्यावर वाट चुकतो आणि त्याच्याकडे असलेले अन्नपाणी संपून जाते. तो मोठ्या मुश्किलीने काही पावले टाकतो. प्रत्येक वेळेस त्याला दूरवर ओॲसिस म्हणजेच मृगजळ असल्याचा भास होत राहतो. त्या आशेवर तो वाळवंटातील हिरवळीचा प्रदेश आत्ता गाठता येईल म्हणून चालत राहतो. अचानक त्याला एक झोपडी दृष्टीस पडते. त्याच्या चालण्याचा वेग वाढतो. तो झोपडीच्या आत जातो तेव्हा तिथे झोपडीच्या आत हातपंप (Hand pump) दिसतो. तो आशेने त्याचा दांडा खालीवर करतो; परंतु त्यातून एक थेंबसुद्धा पाणी बाहेर येत नाही. तो थकलेला असतो. गलितप्राण होऊन तो आडवा पडतो. त्याचे डोळे मिटत असताना, त्याला हातपंपाच्यावर एक पाण्याने भरलेली बाटली बांधलेली दिसते. तो झटक्यात उठतो. ती बाटली हातात घेतो आणि ती तोंडाला लावणार इतक्यात त्याला बाटलीवर ठळक अक्षरात काही लिहिलेले दिसते म्हणून तो ते वाचण्याचा प्रयत्न करतो. मळकट झालेल्या अक्षरांवरून तो हात फिरवतो आणि त्याला दिसते की त्यावर लिहिलेले असते हातपंप चालू करण्यासाठी या बाटलीतले पाणी त्यात ओतावे आणि आपले पाणी पिऊन झाल्यावर परत ही बाटली भरून ठेवावी! तो पाहतो तर हातपंपावर पाणी कुठून ओतायचे त्याचा बाण दाखवलेला असतो. तो क्षणभर विचार करतो की हे पाणी मी जर यात टाकले आणि हातपंप सुरू झाला नाही, तर यात टाकलेले पाणी कुठून तरी जमिनीत निघून जाणार आणि ते वाया जाणार. जे पाणी पोटात जाणार आहे, जे मला जीवदान देणार आहे तेही मी यात टाकून डोळ्यांसमोर आपण आपला मृत्यू पाहायचा का?

खरंतर ती वेळ विचार करण्याची नव्हतीच. काही क्षणांमध्ये पाण्याअभावी तो मरणार होता. द्विधा मनस्थितीत त्यांने निर्णय घेतला की हे पाणी आपण हातपंपामध्ये टाकून पाहू कारण कोणीतरी टाकून हा सुरू केला असणार आणि त्यानेच हे लिहून ठेवले असणार! तो ते पाणी हातपंपामध्ये टाकतो आणि हातपंपाचा दांडा परत खाली वर करू लागतो, तर त्यातून चक्क अतिशय थंडगार आणि गोड पाणी बाहेर येऊ लागते. तो मनसोक्त पाणी पितो इतकेच नव्हे तर त्याच्याकडे असलेल्या सगळ्या बाटल्या, डबे भरून पाण्याने भरतो. तो त्या पाण्याच्या बाटलीवर लिहिल्याप्रमाणे, ती पाण्याची बाटली पूर्ण भरून परत हातपंपावर लटकवून ठेवतो. त्याला थोडी तरतरी येते. तो इकडेतिकडे नजर फिरवतो आणि त्याला एक काचेची बाटली दिसते ज्याच्या आत एक कागद ठेवलेला असतो. तो बाटलीचे झाकण उघडून कागद वाचतो. वाळवंटातून बाहेर जाण्याचा तो नकाशा असतो. तो मार्ग लक्षात घेऊन तो नकाशा परत काचेच्या बाटलीत ठेवून झाकण लावतो. दोन-चार पावले टाकल्यावर त्याच्या काही मनात येते आणि तो परत त्याच्या झोपडीत शिरतो. आपल्या बॅगेतून कागद आणि पेन काढून मोठ्या अक्षरात लिहितो की हातपंपा वर लटकवलेल्या बाटलीतून पाणी टाकल्याने खरोखर तो चालू होतो!

यानंतर तो झपाट्याने पावले टाकत वाळवंटातून सुखरूप बाहेर पडतो.

या गोष्टीतून आपण नेमके काय घ्यायचे? असे कोणीतरी कागदावर लिहिलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवायचा का? यावर 'होय' किंवा 'नाही' ही दोन्ही उत्तरे माझ्या माहितीप्रमाणे तरी बरोबरच आहेत; परंतु त्याला अंतर्मनाने दिलेला कौल खरा निघाला, इतकेच! परंतु त्याच्यानंतर जो कोणी वाळवंटात त्याच्यासारखाच भटकला असेल तोही निश्चितपणे जगू शकेल! असे सामाजिक कार्य करून तो तिथून बाहेर पडला, असे मानायला हरकत नाही.

प्रत्येक वेळेस आपल्याला मिळालेला सल्ला हा लागू पडतोच, असे नाही; परंतु अगदी जीवनमरणाचा प्रसंग नसेल, तर तो सल्ला आपण मानून एखादा प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे? आपला कोणीतरी जवळचा जिवलग आपल्याला सल्ला देतो तेव्हा त्यामागे अनुभवाचे संचित असते, आपली काळजी असते त्यामुळे विश्वासाने त्या सल्ल्यानुसार मार्गक्रमण करून बघायला काय हरकत आहे?

जीवन हे वाळवंटासमानच असते. मृगजळाचा शोध घेतच वाटचाल करावी लागते. मृगजळ फक्त कवी कल्पना नाही, कधीकधी ते वास्तवही असते!

pratibha.saraph@gmail.com



# बहिरंगापेक्षा अंतरंग सुधारा

**लहानशा गोष्टी, मोठा अर्थ** — **शिल्पा अष्टमकर**



**रूप लावण्य अभ्यासिता नये |**
**सहजगुणासी न चले उपाये |**
**काहीतरी धरावी सोये |**
**अगांतुक गुणाची |**

या ओवीत समर्थांनी "सहजगुण" आणि "अगांतुक" गुण असे दोन शब्द वापरले आहेत. जन्मतःच माणसाला जे प्राप्त होते त्याला समर्थ सहजगुण म्हणतात. उदा. गोरा असणे किंवा काळा असणे, उंच असणे किंवा बुटका असणे, दिसायला सुंदर असणे किंवा दिसायला सामान्य असणे हे सहज गुण आहेत. यात बदल घडवून आणणे माणसाला फारसे शक्य नाही. एखादा काळ्या रंगाचा मनुष्य रोज ब्युटी पार्लरमध्ये गेला तरी काही होणार नाही. म्हणून माणसाने व्यवहारात चार लोकांत वावरताना बहिरंग नीटनेटके ठेवावे पण ते फार सजवण्याच्या भानगडीत पडू नये.

समर्थ अगांतुक गुणाला महत्त्व देतात. अगांतुक गुण याचा अर्थ प्रयत्नांच्या सहाय्याने माणसाने संपादन केलेले उत्तम गुण किंवा उत्तम कला होय.

अब्राहम लिंकन दिसायला कुरूप होते, पण आपल्या सद्‌गुणांच्या सहाय्याने ते एक दिवस अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. यशवंतराव चव्हाण अत्यंत गरीब कुटुंबात जन्मले होते; परंतु प्रयत्नांच्या सहाय्याने ते एक दिवस भारताचे उपपंतप्रधान झाले. सहज गुणाच्या अभावाने माणसात निर्माण झालेले व्यंग अगांतुक गुणाच्या प्रभावाने दूर करता येते. माणसाने तासनतास आरशासमोर बसून आपला चेहरा सुधारण्यापेक्षा तासनतास ग्रंथालयात बसून आपले अंतरंग सुधारावे.

शिक्षणानंतर नोकरी मिळताना आपले बहिरंग कामी येणार नाही कारण त्यासाठी गुणवत्ता (Qualification) सर्वात महत्त्वाची मानली जाते. मनुष्याची पारख / परीक्षा त्याच्यावरून दिसण्यात, सहवासात किंवा वागण्यात होत नसते. जसे सोने दिसण्यात, हातात घेतल्यास जवळ ठेवल्यास त्याची पारख होत नसून, काशावर घासताना सोन्याचा गुणधर्म कळतो. बहिरंगापेक्षा अंतरंग सुधारा. सहज गुण व अगांतुक गुण यातील फरक लक्षात घ्यायला हवा. 'खोटे वरचे लक्षण, हवी अंतरीची खूण' समोरच्या व्यक्तीची पारख त्याच्या वरच्या गुणांवरून करू नये.

आजच्या झगमगत्या जगात आपण बाह्य सौंदर्याकडे, म्हणजेच बहिरंगाकडे, अधिक झुकतो आहोत. व्यक्तीचा चेहरा कसा दिसतो, कपडे कोणते आहेत, सोशल मीडियावर कशी इमेज आहे. या गोष्टींनाच जास्त महत्त्व दिलं जातं. पण खऱ्या अर्थाने माणसाचे मूल्य त्याच्या अंतरंगातून ठरते. म्हणजेच त्याच्या विचारांतून, आचारांतून आणि चारित्र्यातून.

बहिरंग म्हणजे माणसाचा बाह्य आविष्कार-रूप, वेशभूषा, संपत्ती, पद, प्रसिद्धी वगैरे, तर अंतरंग म्हणजे त्याचे मन, संवेदना, मूल्य आणि आत्मिक समृद्धी. एक देखणा माणूस जर दांभिक, खोटारडा आणि स्वार्थी असेल, तर त्याचं सौंदर्य फक्त डोळ्यांना भुरळ घालेल; पण मनाला नाही. दुसरीकडे, एक साधा-सरळ माणूस जर नम्र, प्रामाणिक आणि सहृदय असेल, तर तो कायम मनात घर करतो.

आज अनेक लोक फिटनेससाठी, फॅशनसाठी आणि छायाचित्रांसाठी तासन्तास वेळ घालवतात, पण आत्मपरीक्षण, सद्विचार आणि आत्मिक विकासासाठी वेळ देत नाहीत. हीच खरी शोकांतिका आहे.

अंतरंग सुधारल्यावर माणूस दुसऱ्यां नीट वागतो, सहकार्य करतो, सहानुभूती दाखवतो. समाजात समृद्धी, शांती आणि सुसंवाद निर्माण होतो. बाह्य सौंदर्य नाही होऊ शकते, पण अंतःकरणातील सौंदर्य चिरंतन टिकते.

संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, स्वामी विवेकानंद यांचं व्यक्तिमत्त्व आपण पाहि तर ते त्यांच्या वेशभूषेने नव्हे, तर त्यांच्य अंतरीच्या तेजाने, विचारांनी आणि कार्या प्रभाव टाकतात.

म्हणूनच, आपला खरा विकास करा असेल, तर फक्त आरशात दिसणाऱ्या चेहऱ्यावर लक्ष केंद्रित करू नका, तर अंतर्मनात डोकावून बघा. कारण बहिरंग क्षणिक असते, पण अंतरंग शाश्वत.

"शरीर सुंदर असणं ही एक गोष्ट अ पण मन सुंदर असणं ही जीवनाची गरज आहे."

# बिंदुसरा नदीपात्रात खोलीकरण

धोरण | आ.संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकाऱ्यांकडून शुभारंभ




पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: शहरातून जाणाऱ्या बिंदू बिंदुसरा नदीपात्रात स्वच्छता आणि खोली करण्याच्या कामाचा आमदार संदीप क्षीरसागर व जिल्हाधिकारी यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला असून प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे. बिंदुसरा नदीच्या खोलीकरणामुळे शहरातील पाणी पातळीत मोठी वाढ होणार असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

बीड नगरपालिकेच्या वतीने, शहरात असलेल्या बिंदुसरा नदीपात्रात खोलीकरण ठाणे स्वच्छतेच्या कामाला युद्धपातळीवर सुरुवात करण्यात आली असून कामाचा शुभारंभ आमदार संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, माजी आमदार सय्यद सलीम, बीड नगरपालिकेच्या प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी कविता जाधव, नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे, नायब तहसीलदार सुहास हजारे यांच्यासह संबंधित अधिकारी कर्मचारी व नागरिकांची उपस्थिती होती.

### आ.क्षीरसागरांकडून तातडीने आर्थिक तरतूद

बिंदुसरा नदीपात्राचे खोलीकरणाचे आणि स्वच्छता काम परिपूर्णतेने आणि प्रभावी व्हावे याकरिता जिल्हाधिकारी व प्रशासनाकडून आर्थिक तरतूदीचा विषय काढताच आ.संदीप क्षीरसागर यांनी स्वेच्छेने आपल्या स्थानिक विकास निधीतून २५ लक्ष रूपयांची तातडीने तरतूद केली.

# जलजिवन अडीच वर्षांपासून प्रलंबित !

## भूमिका:निकृष्ट दर्जाचे काम, उपोषणाचा इशारा

पुण्यभूमी प्रतिनिधी

केजःकेज मौजे जिवाचीवाडी ता. केज येथील जल जीवन योजना गेली दोन ते अडीच वर्षापासून प्रलंबित व काम निकृष्ट दर्जाचे यामुळे उपोषण करण्यात येणार असून याविषयी सविस्तर वृत्त असे की मौजे जिवाचीवाडी जल जीवन येथील जल-जीवन मिशन या योजनेच्या कामावरती प्रशासन दरबारी पत्रा व्यवहार करून देखील प्रशासनातील अधिकारी यांचे असलेले दूर लक्ष्य व अंदाजपत्रकाप्रमाणे गावांर्गत पाईप लाईन असून देखिल गेले दोन अडीच वर्ष झालं प्रलंबित असून याकडे पूर्णपणे प्रशासनाचे दूरलक्ष्य आहे. जल जीवन मिशन योजनेतील जॅकवेल विहीरीचे काम अपूर्ण व त्यामध्ये बोरवेल चार घ्याचे असून तसेच खोलीकरण याकडे अधिकारी यांच्याकडे गांभीर्य नसून काम करू बघू असे खोटे आश्वासन देण्यात येत असून तरी मौजे



जिवाचीवाडी येथील जल जीवन मिशन योजनेच्या अपूर्ण कामाच्या संदर्भात उपोषणाचा मार्ग निवडला असून याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले तर भागवत चौरे व समस्त गावकरी जिवाचीवाडी येथील तलावात आत्मदहन करणार याची सर्वस्वी प्रशासन जबाबदारी राहील असे निवेदनाद्वारे भागवत चौरे यांनी प्रशासनाला निवेदनाद्वारे म्हटले आहे.

# स्ट्रीट लाईट रस्ता दुरुस्तीची मागणी

## तत्पर:सुविधांसाठी राष्ट्रवादीचे निवेदन



पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी:राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राहुरी शहर अध्यक्ष निलेश शिरसाठ यांच्या नेतृत्वाखाली राहुरी नगरपरिषदेला निवेदन देण्यात आले निवेदनात नगर मनमाड रोडवरील नगरपालिका अंतर्गत स्टेट लाईट दुरुस्ती करणे रस्त्यावरील खड्ड्याची डाग डुजी करणे तसेच रस्त्यावरील गटारींची साफसफाईची मागणी करण्यात आली

नगर मनमाड रस्तावरील राहुरी नगरपरिषदेच्या अंतर्गत असलेल्या रस्त्यावरील लाईट अनेक दिवसांपासून बंद असून अनेक ठिकाणी अंधार पसरला आहे रात्रीच्या वेळी अंधारात बाहेर पडणे मुश्किल झाले आहे. अनेक ठिकाणी बंदिस्त गटारीचे काम झाले आहे परंतु पावसाळ्यात पाणी जाण्याची सोय नसल्याने रस्त्यावर पाणी साचुन राहत त्या ठिकाणी पाणी साचून राहिल्याने रस्त्यावर खड्डे पडले असून त्याची डागडुजी करण्याची मागणी करण्यात आली आहे निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष निलेश शिरसाठ मनोज गवळी सुभाष शिरसा स्वराज शिरसाठ अक्षय शिरसाठ भीम आर्मीचे दिपक साळवे आदींच्या सह्या आहेत

# सोहम बुंदलेचे परीक्षेत यश



पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:स्तंभ लेखक, पुण्यातील प्रसिद्ध सिने-पत्रकार, विश्वविक्रम वीर डॉ.दीपक बुंदेले हयाचे सुपुत्र सोहम बुंदेले ह्यांनी दहावी च्या परीक्षेत ९१% मिळवून दैदीप्यमान यश मिळविले आहे सोहम बुंदेले केंद्रीय विद्यालय मध्ये शिकत होता सोहमला डॉक्टर बणण्याचे स्वप्न आहे त्याच्या या यशाबद्दल मित्र परिवाराकडून शुभेच्छा दिल्या आहेत.

# ...अन्यथा स्वत:ला फुकून घेईल

## आक्रमक:समाधान मुंडेच्या आईचा इशारा

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी : शिवराज दिवटे मारहाण प्रकरणी दहा जणांविरुद्ध परळी संभाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्यात आरोपी समाधान श्रीकृष्णा मुंडे नामक तरुण आहे . परंतु शिवराजला मारहाण झाल्याच्या अगोदर समाधान मुंडे याला काही प्रौढ लोक मारहाण करतांनाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या वरुन समाधान मुंडे याची आई छाया श्रीकृष्ण मुंडे आक्रमक झाल्या आहेत . त्यांनी समाधान ला मारहाण करणाऱ्या लोकांविरुद्ध परळी शहर पोलीसात तक्रार दिली आहे. तक्रार दिल्यानंतर माध्यमांशी बोलतांना छाया श्रीकृष्ण मुंडे म्हणाल्या कि, माझा मुलगा समाधान मुंडे यास दिनांक १६ मे रोजी काही लोकांनी रिंगण करुन जबर मारहाण केली आहे. या बाबतचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या प्रकरणी मि परळी पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दिली आहे. याला धरा ,कोयत्याने मारा असे म्हणत असल्याचे व्हिडिओ मध्ये दिसत आहे.



सदरील व्हिडिओ मध्ये मारहाण करणारे प्रौढ माणसे दिसत आहेत. समाधान ला अगोदर मारले म्हणून त्याने त्या शिवराज गित्तेला उचललं आणी मारलं ,समाधानने त्याला मारण्याची चुक केली. त्याने त्याला मारण्याऐवजी पोलिस केस करायला पाहिजे होती. माझा मुलगा तिथेच चुकला, शिवराज यास उचलून माळावर नेऊन मारलं त्याचा व्हिडिओ व्हायरल झाला .परंतु समाधान यास देखील काही लोक मारहाण करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्याच्या बाबत मि तक्रार दिली आहे. मारहाण करणारे जेवढे लोक आहेत तेवढे लोक मला जेल मध्ये दिसायला हवेत , या प्रकरणावरुन अनेकजण जातीयवाद म्हणत आहेत परंतु यात जातीवाद कसला ? शिवराज ला मारहाण करतांना मराठा समाजाची पोरं सुद्धा आहेत. यात कसलाही जातीवाद नाही. समाधान मुंडे यास मारणारे सुहास साबळे , परमेश्वर साबळे ,महेश साबळे ,ज्ञानेश्वर साबळे यांच्या वर सुध्दा तोच गुन्हा दाखल झाला पाहिजे ,माझ्या लेकराला न्याय पाहिजे नाही तर पोलीस स्टेशन समोर पेट्रोल अंगावर औतून फुकून घेऊन जिव देईल असा इशारा समाधान मुंडे याची आई छाया श्रीकृष्ण मुंडे यांनी दिला आहे.

# माजलगावात मंत्री सिरसठांचा सत्कार

## प्रा.विलास जावळे:नागरिकांनी उपस्थित रहावे

पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय सिरसठ यांच्या नागरी सत्कार सोहळ्याचे भव्य आयोजन माजलगाव येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी पाटोदा शहरासह तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रा. विलास जावळे (सामाजिक कार्यकर्ता) यांनी केले आहे.

हा नागरी सत्कार सोहळा २४ मे २०२५ रोजी दुपारी ४ वाजता, जूना मोंढा, माजलगाव येथे होणार आहे. छत्रपती संभाजीनगर



जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल आणि सामाजिक न्याय खात्याच्या मंत्रीपदाची जबाबदारी स्विकारल्याबद्दल त्यांचा हा सत्कार बहुजन समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्याला बहुजनांचे नेते बाबुराव पोटभरे, आमदार प्रकाश (दादा) सोळंके, आमदार धनंजय मुंडे (डीएम), आमदार सुरेश धस (आण्णा), आमदार विजयसिंह पंडित (राजे) तसेच शिवसेनेच्या नेत्या हर्षदा सिरसठ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमात विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, मोठ्या उत्साहात नागरी सत्कार सोहळा पार पडणार आहे. बहुजन समाजातील युवक, नागरिक व महिलांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे प्रा. विलास जावळे यांनी आवर्जून सांगितले आहे.

# तिरंगा रॅलीस उपस्थित रहावे

## शेख करामत:लोणारमध्ये काँग्रेसची तिरंगा रॅली

पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:ऑपरेशन सिंदूरद्वारे पेहेलगाम येथे झालेल्या भ्याड हल्लयाला भारताच्या तिन्ही सैन्य दलानी जश्यास तसे उत्तर देऊन पाकिस्तानी अतिरेक्यांचे अड्डे उध्वस्त केले व मोठा धडा शिकवला.



भारतीय सैन्य दलाने केलेल्या कारवाईचा समस्त भारतीयांना अभिमान आहे, या ऑपरेशन सिंदूर मध्ये आपल्या जीविताची आहुती देणाऱ्या व मोठी झुंज देणाऱ्या भारतीय सैन्याप्रती अभिमान व्यक्त करण्यासाठी, त्यांनी दाखविलेल्या शौर्याबद्दल मानवंदना देण्यासाठी,त्यांचे कौतुक करण्यासाठी २१मे २०२५ ला सकाळी १० वाजता काँग्रेस प्रदेश अध्यक्ष मा.आमदार हर्षवर्धन सपकाळ( बंटी दादा) यांच्या आदेशान्वये जिल्हा अध्यक्ष (कार्यवाहक) प्रकाश पाटील यांच्या सूचनेनुसार प्रदेश सरचिटणीस श्याम ऊमाळकर, माजी जिल्हाध्यक्ष लक्ष्मणराव घुमरे, पक्ष निरीक्षक वसंत देशमुख तालुका अध्यक्ष राजेश मापारी, गट नेते भुषान मापारी, अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष मो.तोफिक कुरेशी, इतर सर्व काँग्रेस पद अधिकारी यांच्या नेतृत्वात लोणार शहरातून भव्य तिरंगा रॅली बुधवार दि २१ मे २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता स्थळ:- लोणार बस स्टॅन्ड ला सुरवात ते हुतात्मा स्मारक, पंचायत समिती लोणार पर्यंत काढण्यात येत आहे

तरी तिरंगा रॅली मध्ये माजी सैनिक, काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील ,पक्षातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत राहावे अशी विनंती.

# देवगावच्या रोड कामात बोगसगिरी!

## निवेदन:ग्रामस्थ बसणार उपोषणास

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:केज तालुक्यातील देवगाव येथील रोडच्या कामकाजाच्या बोगस निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की त्या कामकाजाबाबत चौकशी करण्यासाठी व सदरील यंत्रणेवर कायदेशीर कार्यवाही करणे आवश्यक होते पण अर्ज दिनांक १९/०५/२०२५ रोजी पर्यंत त्या कामाची कसलीही चौकशी केलेली नाही. त्यामुळे मा. साहेबांना त्या बाबत स्मरणपत्र देण्यात आले आहे. सदरील स्मरणपत्राचा तक्रार अर्जाचा विचार करुन त्या कामाच्या संबंधित शासकीय कर्मवारी व सदरील



कंत्राटदार यांच्यावर कार्यवाही करुन आमच्या रस्त्याच्या कामकाज डबल १० दिवसात चांगल्या प्रकारे केले नाही तर कैलास मुंडे ०५/०६/२०२५ रोजी केज तहसिल समोर गावातील नागरिका सोबत उपोषण करणार आहे. उपोषण करुनही वरील रस्त्याचे कामकाज डबल व संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्या कार्यवाही नाही झाल्यास मा. पालकमंत्री साहेब दिनांक ०५/ ६/२०२५ तारखेच्या नंतर ज्यापण दिवशी बीड जिल्हा दौऱ्यावर असतील त्या दिवशी त्याच्या समोर आवक विभागात्मदहन कैलास अर्जुन मुंडे करणार आहे. असे निवेदनाद्वारे कैलास मुंडे यांनी म्हटले आहे.

मागणी | शाळा कृती समितीचे अजित पवारांना निवेदन

# अंशतःअनुदानित शाळा टप्पा वाढीची प्रश्न

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: राज्यातील १४ ऑक्टोबर २०२४ च्या विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांच्या टप्पा वाढीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करून येत्या पावसाळी अधिवेशनात भरीव आर्थिक निधीची तरतूद करून आमचा प्रलंबित असणारा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजित पवार यांनी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या शिष्टमंडळाला दिले.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित पवार हे काल दि.१९ मे रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने राज्याचे अर्थमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या मध्ये प्रामुख्याने राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेध्याशानुसार वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आवश्यक निधीची तरतूद करावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील सर्व विनाअनुदान आणि अंशतः अनुदानित शाळांच्या टप्पा वाढीचा निर्णय आपणच घेतला आहे. काही कारणास्तव निधी उपलब्ध झालेला नाही; परंतु येत्या पावसाळी अधिवेशनात राज्यातील सर्व विनाअनुदानित शाळासह अंशतः अनुदानित शाळांच्या वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या भरीव अशा आर्थिक निधीची तरतूद करून वाढीव टप्प्याचे अनुदान



मंजूर करून तुमचा प्रलंबित राहिलेला प्रश्न मार्गी लावणार असल्याचे ना. अजित पवार यांनी या वेळी सांगितले. त्यामुळे येत्या पावसाळी अधिवेशनात वाढीव टप्प्याच्या निधीची तरतूद होऊन खूप दिवसांपासून टप्पा वाढीचा असलेला हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याचे संकेतच अजित पवार यांनी दिल्याने विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यात चैतन्याचे वातावरण तयार झाले आहे.ना. अजित पवार यांना निवेदन देताना महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष श्री. जितेंद्र डोंगरे सर, बीड जिल्हाध्यक्ष श्री.आत्माराम वाव्हळ सर, श्री.शिवप्रसाद शिरसाट सर, श्री. संजय देवा कुलकर्णी आदी बहुसंख्येने शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# भागुबाई गलांडे यांचे निधन!

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील भागुबाई तुकाराम गलांडे यांचे दुःख वयाच्या १०२ वर्षांनीं निधन झाले त्यांच्या दुःखात सहकुटुंब सहपरिवार अत्यंत दुःखात आहे भागुबाई तुकाराम गलांडे यांचा परीवार सहा मुले आहे गौतम, उत्तम, सखुबाई, तारामती, व माणीक, शांताबाई असे सहा लेकरे व त्यांचे नातु ज्ञानेश्वर, इंद्रजित, रोहन, महादेव, गणेश, संदीप, आशिष,अक्षता, प्रदीप,स्वाती, कल्पना,बाळुबाई,रुपाली, अंजु, मनीषा,बाळुबाई,राज्याभाऊ,राधा,चिवबाई, असे नातवंडे आहेत असा परीवार भागुबाई गलांडे यांच्या दुःखात आहे यांना सर्वांना धिर मिळावा यासाठी बीड



जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी भेट घेऊन पत्राद्वारे सांत्वन केले तसेच यांच्या दुःखात चिंचोली माळी येथील गावकरी सहभागी आहेत तरी भागुबाई तुकाराम गलांडे यांच्या आत्म्याला शांती देव शांती देव हीच सर्वांनी प्रार्थना केली आहे.